सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०२ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## अशोक खरात शिर्डी पोलिसांच्या ताब्यात आणून चौकशी सुरु

**शिर्डी ( प्रतिनिधी) :** राहाता येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेत बोगस खाती उघडून आर्थिक व्यवहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेला आरोपी अशोक खरात याला शिर्डी पोलिसांनी नाशिक मध्यवर्ती कारागृहातून ताब्यात घेतले आहे. न्यायालयाची परवानगी घेतल्यानंतर त्याला पुढील तपासासाठी शिर्डी पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून, त्याची सखोल चौकशी सुरू आहे. समता पतसंस्थेच्या राहाता शाखेत बनावट कागदपत्रांच्या आधारे काही व्यक्तींच्या नावाने खाती उघडण्यात आल्याचा आरोप आहे. या खात्यांमधून मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याची बाब तपासात समोर आल्यानंतर शिर्डी पोलिसांनी अशोक खरात व संबंधित शाखा व्यवस्थापकासह अन्य संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

तपासादरम्यान अनेक खातेदारांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. काहींनी आपल्या नावाने खाते उघडल्याची माहिती नसल्याचे सांगितले असून, त्याआधारे पोलिसांकडून कागदपत्रे, केवायसी प्रक्रिया आणि व्यवहारांची पडताळणी केली जात आहे. अशोक खरात याला ताब्यात घेतल्यानंतर या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांचे नेमके स्वरूप, बोगस खाती उघडण्यामागील सूत्रधार, व्यवहारात सहभागी असलेले इतर संशयित तसेच पतसंस्थेतील अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची भूमिका याबाबत चौकशी केली जाणार आहे. या चौकशीतून समता पतसंस्था प्रकरणातील आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

# 'एका धुरंधराला पुरस्कार देण्यासाठी दुसरे धुरंधर आले' : मुख्यमंत्री फडणवीस

**पुणे :** लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचे भरभरून कौतुक करत केलेले भाषण विशेष चर्चेचा विषय ठरले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात झालेल्या या कार्यक्रमात अमित शाह यांच्या हस्ते अजित डोवाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना फडणवीस म्हणाले, "आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आहे. राष्ट्रीय सुरक्षेला नवी दिशा देणारे अजित डोवाल यांना सन्मानित करण्यासाठी राजकारणातील धुरंधर अमित शाह उपस्थित आहेत. एका धुरंधराला पुरस्कार देण्यासाठी दुसरे धुरंधर आले आहेत."



**अमित शाहांना दिली 'राजकारणातील चाणक्य'ची उपमा :** फडणवीसांनी आपल्या भाषणात अमित शाह यांना "राजकारणातील चाणक्य", तर अजित डोवाल यांना "राष्ट्रीय सुरक्षेचे चाणक्य" अशी उपमा दिली. त्यांनी सांगितले की, २०१४ नंतर देशाच्या सुरक्षा व्यवस्थेत मोठे बदल झाले असून, भारताची भूमिका आता केवळ बचावाची नसून आवश्यकतेनुसार ठोस प्रत्युत्तर देणाऱ्या राष्ट्राची झाली आहे.

**लोकमान्य टिळकांच्या विचारांचा गौरव :** लोकमान्य टिळकांचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच," हा संदेश देत टिळकांनी राष्ट्रवादाची ज्योत प्रज्वलित केली. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणत त्यांनी स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. अशा राष्ट्रवादी विचारांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार अजित डोवाल यांना मिळणे हा अभिमानाचा क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

**'अजित डोवाल यांना शंभरीपर्यंत देशसेवेची शक्ती लाभो' :** आपल्या भाषणाच्या शेवटी फडणवीस म्हणाले, "अजित डोवाल यांना शंभर वर्षांपर्यंत देशसेवा करण्याची शक्ती लाभो, अशी मी प्रार्थना करतो. राष्ट्रप्रेम, त्याग आणि देशभक्तीचे प्रतीक असलेल्या व्यक्तीला हा पुरस्कार मिळणे ही सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे." फडणवीसांच्या या भाषणाला उपस्थितांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. अमित शाह, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेला हा पुरस्कार सोहळा विशेष ठरला.

# शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान येथे श्री गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये 07 कोटी 81 लाख 13 हजार 377 इतकी देणगी प्राप्त



**तभा वृत्तसेवा / बाळासाहेब सोनवणे**

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने बुधवार दि. २८ जुलै २०२६ ते शुक्रवार दि. ३० जुलै २०२६ या कालावधीत आयोजित केलेल्या श्री गुरूपौर्णिमा उत्सवामध्ये रुपये ०७ कोटी ८१ लाख १३ हजार ३७७ इतकी देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. सदर देणगी मध्ये रोख स्वरुपात रुपये ०२ कोटी ०४ लाख ३५ हजार ५५७ दक्षिणा पेटीत प्राप्त झाली असून, देणगी काऊंटरवर ०१ कोटी २५ लाख ४७ हजार ९३५ रुपये, पी.आर.ओ.देणगी ८७ लाख १४ हजार, डेबीट क्रेडीट कार्ड,ऑनलाईन देणगी, चेक डी.डी.देणगी, मनी ऑर्डर असे एकूण ०२ कोटी ०७ लाख ८४ हजार ७०१ रुपये, परकीय चलनाद्वारे ०५ लाख ६५ हजार ९९१ रुपये, सोने १,१२५.५७० ग्रॅम प्राप्त झाले असून त्याचे मुल्य रक्कम रुपये ०१ कोटी ४६ लाख ७४ हजार ५४४ व चांदी २,३७६.५०० ग्रॅम प्राप्त झाली असून तीचे मुल्य रक्कम रुपये ०३ लाख, ९० हजार ६४९ असे आहे.

श्री गुरूपौर्णिमा उत्सव कालावधीत साधारणतः ०३ लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला. उत्सव कालावधीमध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे ०१ लाख ९४ हजार २८५ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा तर ३९,६११ अन्नप्रसाद पाकिटांचा लाभ घेतला. दर्शन रांगेत ०१ लाख ६५ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात आले.

या कालावधीत ७१ लाख ०७ हजार ३६० रूपये सशुल्क प्रसादरुपी लाडू पाकीटांच्या माध्यमातून प्राप्त झाले. उत्सव काळात हजारो साईभक्तांनी संस्थानच्या साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्त निवासस्थान, व्दारावती निवासस्थान, साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा आदी ठिकाणांबरोबर अतिरिक्त निवास व्यवस्थेकरीता उभारण्यात आलेल्या मंडपात निवास व्यवस्थेचा लाभ घेतला. तसेच साईधर्मशाळा येथे विविध भागातून आलेल्या ३९ पालख्यांमधील पदयात्री साईभक्तांनी निवास व्यवस्थेचा लाभ घेतला असे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सांगितले.

# 'अँम्ब्युलन्स' सेवांच्या मनमानी भाडेवसुलीला लगाम

## राज्यात नवे धोरण येणार; प्रत्येक रुग्णवाहिकेवर असणार शासनाची डिजिटल नजर

**मुंबई :** राज्यातील रुग्णवाहिका (अँम्ब्युलन्स) सेवा अधिक सक्षम, सुरक्षित, पारदर्शक आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्यासाठी मोटार वाहन विभागामार्फत लवकरच सर्वसमावेशक 'महाराष्ट्र राज्य रुग्णवाहिका धोरण' आखण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी दिली. या नव्या धोरणामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत आणि रास्त दरात सेवा मिळणे शक्य होणार असून, प्रत्येक रुग्णवाहिकेवर शासनाची डिजिटल नजर असणार आहे.

सध्या राज्यात १०८ सेवा आणि खासगी, धर्मादाय संस्थांच्या मिळून सुमारे ५ हजार ५०० रुग्णवाहिका कार्यरत आहेत. मात्र, त्यांची उपलब्धता, दरपत्रक आणि प्रतिसादाचा वेळ याबाबत कोणतीही एकसंध यंत्रणा अस्तित्वात नाही. हीच उणीव दूर करण्यासाठी या धोरणांतर्गत चार स्वतंत्र डिजिटल ॲप्लिकेशन्स एकमेकांशी जोडली जाणार आहेत. यामुळे नागरिकांना जवळची रुग्णवाहिका शोधणे, तिचे स्थान (लाइव्ह लोकेशन), अंदाजित भाडे आणि पोहोचण्याची अचूक वेळ समजणे सुलभ होणार आहे. तसेच रुग्णवाहिकेतील उपकरणांची स्थिती आणि चालकाची कामगिरी आरटीओ व आरोग्य विभागाच्या डॅशबोर्डवर दिसणार आहे.

'एआयएस-१२५' वर्गवारीनुसार कमाल दर अधिसूचित केले जातील. प्रत्येक फेरीत डिजिटल पावती देणे आणि ॲपवर दरपत्रक प्रसिद्ध करणे बंधनकारक असणार आहे. याशिवाय, अपघाताच्या वेळी सामान्य नागरिकांना प्राथमिक उपचारांचे (सीपीआर, रक्तस्राव रोखणे) सचित्र मार्गदर्शन डिजिटल प्रणालीद्वारे दिले जाईल.








भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

लिंक्ड इन्श्युरन्स प्रॉडक्टस् हे परंपरागत इन्श्युरन्स प्रॉडक्टस् पेक्षा वेगळे असतात आणि हे जोखिम घटकांच्या अधीन असतात.
लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसीज् मध्ये भरण्यात येणारे प्रिमियम हे बाजारपेठेतील भांडवल आणि जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्याशी संबंधित गुंतवणूकीच्या जोखमींच्या अधीन असतात. फंडाची कामगिरी आणि भांडवली बाजारपेठ/जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्यावर परिणाम करणारे घटक यांच्या आधारे युनिट्सचा एनएव्ही कमी जास्त होऊ शकतो आणि विमाधारक व्यक्ती ही त्याच्या/तिच्या निर्णयासाठी स्वत:च जबाबदार असते.
लाइफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे केवळ लाइफ इन्श्युरन्स कंपनीचे नाव आहे आणि निवेश प्लस हे केवळ संलग्न इन्श्युरन्स कॉन्ट्रॅक्टचे नाव आहे आणि त्यातून कॉन्ट्रॅक्टची गुणवत्ता, त्याच्या भविष्यातील संभावना किंवा परतावे या गोष्टी कोणत्याही प्रकारे सूचित होत नाहीत.
कृपया तुमचे विमा एजंट किंवा मध्यस्थ किंवा इन्श्युरन्स कंपनीने दिलेले पॉलिसी डॉक्युमेन्ट यांच्यामधून संबंधित जोखमी आणि लागू होणारे भार यांची माहिती घ्या.
या कॉन्ट्रॅक्ट अंतर्गत देऊ करण्यात येणारे वेगवेगळे फंड्स ही फक्त फंडांची नावे आहेत आणि ती कोणत्याही प्रकारे या प्लॅन्सची गुणवत्ता, त्यांच्या भविष्यकाळातील संभावना आणि परतावे सूचित करीत नाहीत.

## बीडच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार संदीप क्षीरसागर कटिबद्ध



**बीड दि.३१ (प्रतिनिधी):-** राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि.३१) रोजी बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघाच्या विकासाशी निगडित विविध मूलभूत व महत्त्वपूर्ण प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचे लक्ष वेधले. मतदारसंघातील विकासकामांचा आराखडा मांडून विकासकामांसाठी मागणी केली.

दरम्यान बीडच्या विकासाशी संबंधित प्रत्येक प्रश्न शासनापर्यंत ठामपणे पोहोचवून, विकासकामांना गती देण्यासाठी आणि जनतेच्या हिताचे निर्णय मार्गी लावण्यासाठी माझा सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरूच राहील, असा विश्वास या आ.क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

**आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठकीदरम्यान मांडलेले प्रमुख मुद्दे व मागण्या खालीलप्रमाणे:** १) मराठा समाजातील विद्यार्थिनींसाठी वसतिगृह: बीड शहरातील जवाहर कॉलनी येथील उपलब्ध १० हजार चौ. फूट जागेवर मराठा भवनासोबतच विद्यार्थिनींसाठी सुसज्ज वसतिगृह उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी तातडीने मंजूर करण्याची आग्रही मागणी केली. २) बीडमध्ये नवीन पंचतारांकित MIDC ची मागणी: जिल्ह्याचा औद्योगिक विकास वेगाने व्हावा आणि मागासलेपणाचा अनुशेष भरून निघावा यासाठी बीड येथे 'पंचतारांकित एमआयडीसी' मंजूर करण्याची मागणी केली. ३) नियोजित रेशीम पार्क बीड येथेच करण्याची मागणी: बीड हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने प्रस्तावित रेशीम पार्क बीड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेतच उभारण्यात यावे अशी मागणी केली.

### अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्ण पाठपुरावा करणार : विवेक जॉन्सन

# पूर्णाकृती पुतळ्यासाठी नगरपालिकेत ठराव केला : आ. संदीप क्षीरसागर

बीड | प्रतिनिधी

बीड शहरातील चांदणेवाडा येथून सन १९८२ मध्ये साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या परिवर्तनवादी सार्वजनिक जयंती उत्सवाची सुरू झालेली परंपरा आजही तेवढ्याच उत्साहाने आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेने पुढे नेली जात आहे. गेल्या ४४ वर्षांपासून विविध परिवर्तनवादी उपक्रमांच्या माध्यमातून साजरा होणारा अण्णाभाऊ साठे गौरव महोत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडला.

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांच्या संकल्पनेतून शनिवार (दि. १ ऑगस्ट) रोजी आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवातून सामाजिक समता, संविधानिक मूल्ये आणि परिवर्तनाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. महोत्सवातील विविध उपक्रमांनी नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.





यावेळी समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. एक हजार महिला पंचशील फेटा बांधून भव्य रॅलीत सहभागी झाल्या होत्या. सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्कांबाबत जनजागृती करणारा 'आरक्षण उपवर्गीकरण सामाजिक न्याय रथ' हा यंदाच्या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरला. आकर्षक सजावट, संविधानिक संदेश आणि परिवर्तनवादी विचारांनी सजलेल्या या रथाने शहरातील नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

अभिवादन सभेत बोलताना आमदार संदीप क्षीरसागर यांनी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीसाठी बीड नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करण्यात आल्याची माहिती दिली. या पुतळ्याची उभारणी लवकरात लवकर व्हावी, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही यावेळी उपस्थितांना संबोधित करताना अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीसाठी आवश्यक त्या सर्व प्रशासकीय प्रक्रियेला गती देत जिल्हा प्रशासनाकडून पूर्ण पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक तथा डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सामाजिक न्यायाच्या प्रश्नावर राज्य शासनाचे लक्ष वेधले. "मुख्यमंत्री साहेब, आरक्षण वर्गीकरण तात्काळ लागू करा," अशी मागणी त्यांनी यावेळी केली. संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आणि वंचित समाजाला न्याय मिळावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

महोत्सवाला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आमदार विजयसिंह पंडित, बीड नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, प्रा. प्रदीप रोडे, जयंती उत्सव समितीचे सचिव भारत कांबळे, स्वप्नील गलधर, प्रेमलता चांदणे, शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे, कल्याण आखाडे, सुशीलाताई मोराळे, अशोक लोढा, उत्तम पवार, सतीश कापसे, नाना मस्के, सुनिल पाटोळे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी भव्य 'साहित्य रॅली' काढण्यात आली. अण्णाभाऊंच्या साहित्याचा, संघर्षाचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा संदेश देणाऱ्या या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रॅलीची सांगता शहरातील साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आयोजित अभिवादन सभेने झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि परिवर्तनवादी विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष लोणके यांनी केले, सूत्रसंचालन सुधाकर धुरंधरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाचाही अण्णाभाऊ साठे गौरव महोत्सव सामाजिक परिवर्तन, समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचा जागर करणारा ठरला. चार दशकांहून अधिक काळ अखंड सुरू असलेली ही परंपरा बीडच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील प्रेरणादायी पर्व म्हणून ओळखली जात आहे.

# १० वर्षे सेवा झालेल्या गटप्रवर्तकांना शासकीय सेवेत कायम करा; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन

### एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर सेवासमायोजनाची महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय आरोग्य मिशन गटप्रवर्तक संघटनेची आक्रमक मागणी

**बीड :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (NHM) कार्यरत असलेल्या आणि १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.याच धर्तीवर आरोग्य सेवेचा पाठीचा कणा असलेल्या 'गटप्रवर्तकां'चे देखील शासकीय सेवेत समायोजन करण्यात यावे, अशी आक्रमक मागणी 'महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय आरोग्य मिशन गटप्रवर्तक संघटना' यांच्या वतीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.



या संदर्भात संघटनेच्या वतीने राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित दादा पवार यांना सविस्तर मागण्यांचे निवेदन प्रदेशाध्यक्ष भगवानराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने ३० जून २०२६ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानातील १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या १५,०९० कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी 'अधिसंख्य पदे'निर्माण करून सेवासमायोजनाचा मार्ग मोकळा केला आहे. याच शासन निर्णयाचा संदर्भ देत, "आरोग्य यंत्रणेत रात्रंदिवस राबणाऱ्या गटप्रवर्तकांनाही हाच न्याय लावावा,अशी ठाम भूमिका संघटनेने मांडली आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री

सुनेत्रा पवार यांना निवेदन देताना जिल्हाध्यक्ष सचिन आंधळे,गटप्रवर्तक सारिका आबुज, स्वप्नाली गुंजकर, उषा बारगजे, रोहिणी भोसले, मंगल काळे, रुक्मिणी खांडे, रामलीला जगताप, अश्विनी बावस्कर, रोहिणी डोंगरे, दिपाली काळे मीना मस्के यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### 10 वर्षांच्या सेवेनंतरही कंत्राटीची कुऱ्हाड; दर 11 महिन्यांनी कराराचे नूतनीकरण

राज्यात सुमारे ३,५०० पेक्षा जास्त गटप्रवर्तक आरोग्य विभागात कार्यरत आहेत. दरमहा तब्बल २५ दिवस दौरे करून आशा स्वयंसेविकांच्या कामाचे मूल्यमापन करणे, अहवाल सादर करणे आणि आरोग्य प्रशासन व आशा वर्कर यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करण्याची जबाबदारी गटप्रवर्तक यशस्वीरीत्या पार पाडत आहेत. सर्व गटप्रवर्तक पदवीधर असूनही त्यांना दर ११ महिन्यांच्या बाँड पेपरवर कंत्राटी तत्त्वावर ठेवले जाते.

आरोग्य सेवेत गटप्रवर्तकांचे योगदान अमूल्य आहे. १० वर्षांहून अधिक काळ प्रामाणिक सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेईपर्यंत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष भगवानराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हा लढा अविरत सुरूच राहील. यापूर्वी अनेक वेळा निवेदन देवून पाठपुरवा केला आहे. मात्र आता दखल घेतली नाही तीव्र आंदोलन केले जाईल.

-सचिन आंधळे, जिल्हाध्यक्ष, गटप्रवर्तक संघटना

# परळीत गुरु महिमेचा गजर... ! दिव्य ज्योति जाग्रति संस्थानची गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

### गुरु-शिष्य परंपरेतूनच विश्वकल्याणाचा मार्ग खुला होतो – सुश्री रुचिका भारतीजी

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :** दिव्य ज्योति जाग्रति संस्थानच्या वतीने परमपूज्य श्री आशुतोष महाराजजी यांच्या कृपाशीर्वादाने आयोजित श्री गुरुपौर्णिमा महोत्सव शुक्रवार दिनांक 31 जुलै रोजी परळी वैजनाथ येथील वैष्णवी मंगल कार्यालयात अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. मराठवाड्यासह विविध जिल्ह्यांतून आलेल्या हजारो भाविकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर गुरुभक्तीच्या जयघोषाने दुमदुमून गेला.



कार्यक्रमाची सुरुवात शिवसेना नेते अभयकुमार ठक्कर, सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये, नगरपरिषदेचे गटनेते नितीन बागवाले, नगरसेवक अश्विन मोगरकर, शिवसेना युवा नेते प्राचार्य अतुल दुबे, उद्योजक वैजनाथआप्पा कोल्हे, अखिल भारतीय वारकरी मंडळाचे संस्थापक ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे, पत्रकार धनंजय आढाव, संतोष जुजगर, बालाजी ढगे आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन तसेच परमपूज्य सद्गुरु सर्वश्री आशुतोष महाराजजी यांच्या प्रतिमेची पूजा व महाआरती करून झाली. त्यानंतर सामूहिक भजनाने संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले. टाळ-मृदुंगाच्या निनादात आणि भक्तिगीतांच्या स्वरांत उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

यानंतर दिल्ली येथील परमपूज्य सद्गुरु सर्वश्री आशुतोष महाराजजी यांच्या कृपापात्र शिष्या साध्वी सुश्री रुचिका भारतीजी यांनी प्रभावी अध्यात्मिक प्रवचनातून गुरूचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व उलगडून सांगितले. वेद, उपनिषदे तसेच संत परंपरेतील उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी गुरू हा अज्ञानातून ज्ञानाकडे नेणारा दीपस्तंभ असल्याचे सांगितले.

त्या म्हणाल्या, "भारताची गुरू-शिष्य परंपरा ही जगासाठी आदर्श आहे. श्रद्धा, विश्वास, विनम्रता आणि सेवाभाव या गुणांनी युक्त शिष्यालाच गुरूकृपेचा लाभ मिळतो. गुरू-शिष्य परंपरेतूनच विश्वात्मक कल्याण साध्य होते."

श्रीराम आणि हनुमान यांच्या आदर्श नात्याचा दाखला देत त्यांनी गुरूसेवेचे महत्त्व स्पष्ट केले. जीवनातील संकटांच्या काळात सद्गुरूच योग्य मार्ग दाखवतात. गुरू शिष्याची परीक्षा घेत असतात आणि त्या प्रत्येक प्रसंगात विश्वास व समर्पण कायम ठेवणारा शिष्यच अध्यात्मिक प्रगती साधू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

# राज्यात पर्यावरण युक्त सण, उत्सव साजरे करण्यासाठी आगामी काळात महत्वाचा ॲक्शन प्लॅन आखला जाईल

### मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत पंकजाताई मुंडेंचा प्रत्यक्ष कृतीवर भर

**बीड :** पुढील काळात राज्यात पर्यावरण युक्त आणि प्रदुषणमुक्त सण, उत्सव साजरे व्हावेत यासाठी आमचा प्रयत्न आहे यासाठी महत्वाचा ॲक्शन प्लॅन आखून ठोस कृती केली जाईल अशी माहिती राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत दिली.पर्यावरण पूरक सण, उत्सव साजरे करणे आणि पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यासंदर्भात पर्यावरण विभागाची एक बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या.

पंकजाताई मुंडे पुढे म्हणाल्या, पर्यावरण पूरक सण, महोत्सव साजरे करण्याबाबत 'मन की बात' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले होते, त्या अनुषंगाने आमचा विभाग ठोस पावले उचलत आहे. जैविक दृष्ट्या विघटनशील मूर्ती व तांत्रिक विसर्जन प्रक्रिया यावर एक महत्वाचा ॲक्शन प्लॅन आम्ही तयार करत आहोत. पाच वर्षे, दहा वर्षे असे वेगवेगळे टप्पे करून आगामी काळात हळूहळू पर्यावरणपूरक व प्रदूषण मुक्त मूर्ती व सण साजरे होतील यासाठी प्रयत्न केले जातील. मागील वर्षीचा गणेशोत्सव पर्यावरण विभागाने खूप सुंदर पध्दतीने नगरविकास विभागामार्फत हाताळला होता असे त्या म्हणाल्या.

पंकजाताईंचा कामाचा धडाका ; एकाच वेळी दोन बैठका केल्या अटेंड

एकीकडे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे आज बीडला आल्या होत्या, आणि दुसरीकडे आजच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण विभागाची बैठकही होती. स्व जिल्हयाची आणि स्व खात्याची अशा दोन्ही बैठकांच्या वेळा एकच आल्या आणि दोन्ही बैठका महत्वाच्या होत्या, अशा परिस्थितीतही त्यांनी मार्ग काढला, नियोजन समितीची बैठक अटेंड करत बाहेर गॅलरीत येऊन मुख्यमंत्र्यांची बैठकही त्यांनी ऑनलाईन अटेंड करत समन्वय साधला, त्यांची ही कृती वाखाणण्याजोगी होती.

# निसर्गाच्या सान्निध्यात श्रीकृष्ण मंदिर मांजरसुंबा येथे नेतृत्वगुण विकसन शिबीर संपन्न

बीड (प्रतिनिधी) - विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयाने निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले श्रीकृष्ण मंदिर मांजरसुंबा येथे संस्था विद्यासभेने नियोजित केलेले नेतृत्वगुण विकसन शिबीर आयोजित केले होते.

उद्घाटन सत्रात अध्यक्षस्थानी संस्था कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य हे होते. यावेळी मंदिर व्यवस्थापक पू. रंगनाथ बाबा व महंत सारंगधर बाबा यांच्या उपस्थितीत शिबीराची सुरुवात झाली. या सत्राच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. हेमंत वैद्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की अशा शिबिराच्या आयोजनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो तसेच





व्यक्तीमत्वात चांगला बदल होताना दिसतो. विद्यार्थ्यांनी यातून चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत.

विषय मांडणी करताना श्री उमेश जगताप यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांना उभारी देऊन नेतृत्वगुण विकसित करण्याचे काम आपली संस्था करते. नेतृत्वगुण विकसित करण्याचे बाळकडू विद्यार्थी दशेतच प्राप्त होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. मान्यवरांच्या मनोगतात पू. रंगनाथ बाबा, प्रा. चंद्रकांत मुळे, डॉ. अविनाश देशपांडे यांनी विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना उभारी येण्यासाठी उत्तम असे मार्गदर्शन केले.

या सत्राचे प्रास्ताविक अभ्यास पूरक प्रमुख सौ नीता केंद्रे यांनी केले.

दुसऱ्या सत्रात प्रा. कृष्णा बारटक्के यांनी विद्यार्थ्यांना पंच परिवर्तन या विषयावर महत्त्वपूर्ण असे अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप शालेय समिती अध्यक्ष मा प्रमोदराव कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोप केला.

तिसरे सत्र हे श्रमदान व वृक्षारोपण याविषयी होते. या सत्रात विद्यार्थी व शिक्षकांनी मिळून परिसरात प्रत्यक्ष श्रमदान केले. व अनेक वृक्षांचे रोपं लावले.

**चौथ्या सत्रात विद्यार्थ्यांचे मंडळश:** एकत्रिकरण करून काही प्रमुख शिक्षकांनी बलोपासक, कलोपासक, ज्ञानोपासक, संस्कार मंडळ व विज्ञान मंडळ यांची माहिती दिली.

समारोपाच्या सत्रात काही विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन केले. शिबीर निरीक्षक श्री. रोहित खिंडरे यांनी मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी माजी मुख्याध्यापक श्री विजेंद्र चौधरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या सत्राचे अध्यक्ष म्हणून स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष मा.डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी होते. अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन चि. गौरव जाधव याने केले.

# अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली पोलिसांवर अतिरिक्त बोजा का?

### नगरपालिकेने आपली जबाबदारी पार पाडावी; पोलीस हक्क संघर्ष संघटनेची मागणी

**बीड :** शहरातील वाढते अतिक्रमण, फुटपाथवरील हातगाड्या, रस्त्यांवरील अवैध कब्जे आणि त्यातून निर्माण होणारी वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांच्या अडचणी वाढत आहेत. अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईसाठी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्ताचा वापर होत असल्याने पोलिसांवर आधीच असलेल्या कामाच्या ताणात आणखी भर का घातली जात आहे? असा सवाल पोलीस हक्क संघर्ष संघटना महाराष्ट्र राज्य यांनी उपस्थित केला आहे.

सार्वजनिक रस्ते, फुटपाथ तसेच नगरपालिकेच्या मालकीच्या जागांवरील अतिक्रमण हटविणे, अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावणे आणि नियमानुसार कारवाई करणे ही संबंधित नगरपालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे अतिक्रमणविरोधी कारवाईचे नियोजन आणि नेतृत्व नगरपालिकेने करणे अपेक्षित आहे.

पोलीस विभागाची प्रमुख जबाबदारी कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांना आळा घालणे, गुन्ह्यांचा तपास, नागरिकांची सुरक्षा, गस्त, बंदोबस्त तसेच आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत करणे ही आहे. पोलीस कर्मचारी आधीच विविध जबाबदाऱ्यांच्या मोठ्या ताणाखाली कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत अतिक्रमणविरोधी मोहिमांसाठी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात केल्यास त्यांच्या मूळ कर्तव्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

अतिक्रमण हटविताना संभाव्य विरोध, तणाव किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांची मदत घेणे आवश्यक ठरू शकते. मात्र अतिक्रमण हटविण्याची प्रत्यक्ष प्रशासकीय जबाबदारी नगरपालिकेचीच असली पाहिजे, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

नगरपालिका प्रशासनाने अतिक्रमणांकडे केवळ एखादी मोहीम म्हणून न पाहता नियमित पाहणी करून सातत्याने कारवाई करणे गरजेचे आहे. एकदा अतिक्रमण हटविल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही, यासाठीही प्रभावी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. अन्यथा अतिक्रमणे वाढत राहणार आणि प्रत्येक कारवाईसाठी पोलिसांचे मनुष्यबळ वापरले जाणार, अशी विसंगत परिस्थिती निर्माण होईल.

प्रशासनातील प्रत्येक विभागाने आपापल्या जबाबदारीचे भान ठेवणे गरजेचे आहे. नगरपालिकेचे काम पोलिसांवर आणि पोलिसांचे काम इतर यंत्रणांवर ढकलण्याची प्रवृत्ती थांबली पाहिजे. पोलिसांना नागरिकांची सुरक्षा, गुन्हेगारी नियंत्रण, गुन्ह्यांचा तपास आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या मूलभूत कामांसाठी पुरेसे मनुष्यबळ व वेळ मिळणे आवश्यक आहे.

याच पार्श्वभूमीवर पोलीस हक्क संघर्ष संघटना महाराष्ट्र राज्य यांनी अतिक्रमणविरोधी कारवाईची मुख्य जबाबदारी नगरपालिका प्रशासनाने प्रभावीपणे पार पाडावी आणि पोलिसांचा वापर आवश्यक त्या कायदा-सुव्यवस्था व सुरक्षा व्यवस्थेसाठीच करावा, अशी मागणी केली आहे.

ही मागणी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष जेबा शेख, संस्था उपाध्यक्ष अब्दुल कदीर शेख, महाराष्ट्र सचिव नजीमोद्दीन काझी, राज्य सचिव राजेंद्र लहाने, राज्य प्रवक्ते बाळासाहेब राखे सर आणि पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष वसंत सगळे यांनी केली आहे.

“पोलीस दल आधीच अनेक आव्हानांचा सामना करीत आहे. त्यामुळे पोलिसांवर अनावश्यक अतिरिक्त जबाबदाऱ्या न टाकता संबंधित विभागाने आपली जबाबदारी पार पाडावी. अतिक्रमण हटविताना कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची आवश्यकता असल्यास पोलीस मदत करतील; मात्र अतिक्रमणविरोधी मोहिमेची मुख्य जबाबदारी नगरपालिका प्रशासनाचीच असली पाहिजे,” अशी भूमिका संघटनेने व्यक्त केली आहे.

# हर्सूल येथील पंतप्रधान आवास योजनेतील निकृष्ट बांधकामाची चौकशी करा : ऋषिकेश जैस्वाल

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेमार्फत हर्सूल येथे सुरू असलेल्या पंतप्रधान आवास योजनेतील सदनिकांच्या बांधकामात गंभीर दर्जादोष आढळल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना नगरसेवक ऋषिकेश सरोज प्रदीप जैस्वाल यांनी महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्याकडे केली आहे.

जैस्वाल यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या प्रकल्पाबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून २१ मे २०२६ रोजी थर्ड पार्टी क्वालिटी मॉनिटरिंग एजन्सी (TPQMA) ने सादर केलेल्या अहवालात कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून इमारतीची संरचनात्मक स्थिरता धोक्यात असल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. तसेच एजन्सीने काम तातडीने थांबविण्याची शिफारस केली असतानाही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष करून कंत्राटदाराची देयके अदा करण्याची घाई केल्याचा आरोपही त्यांनी केला.

निवेदनानुसार, अहवालात लोखंडी सळ्यांचे लॅपिंग धोकादायक भागात करण्यात आल्याने इमारतीच्या मजबुतीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच निविदेतील अटींनुसार भूमिगत पाण्याची टाकी एम-३० दर्जाच्या काँक्रीटमध्ये व जलरोधक प्रक्रियेसह बांधणे आवश्यक असताना प्रत्यक्षात विटांचे बांधकाम करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.



याशिवाय प्रकल्पावर काम करणाऱ्या मजुरांना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. कामगारांच्या ईपीएफ, ईएसआयसी तसेच व्यावसायिक करासंदर्भातील नियमांचेही पालन करण्यात आले नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित अधिकारी निविदेतील अटींची अंमलबजावणी न करता कंत्राटदाराला लाभ होईल अशा पद्धतीने काम करत असल्याचा आरोप करत त्यांची बदली करून सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणीही जैस्वाल यांनी केली.

या सदनिकांमध्ये शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व निराधार कुटुंबे वास्तव्यास येणार असल्याने निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे स्वतंत्र तज्ज्ञ संस्थेमार्फत कामाची गुणवत्ता तपासावी, निविदेतील सर्व अटींची पूर्तता झाल्याशिवाय कंत्राटदाराची बिले अदा करू नयेत आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, या निवेदनाची दखल घेत आयुक्त अमोल येडगे यांनी प्रकरणाची गंभीरतेने चौकशी करून आवश्यक ती तातडीची कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

### कुपोषित बालकांसाठी सचिन गरड यांचा स्तुत्य निर्णय

# जिल्हा परिषद सदस्य व स्थायी समिती सभापती पदाचे पाच वर्षांचे मानधन बालकल्याणासाठी सुपूर्द

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष, माजी सरपंच तथा जिल्हा परिषद स्थायी समितीचे विद्यमान सभापती सचिन गरड पाटील यांनी जिल्ह्यातील कुपोषित व गरजू बालकांच्या हितासाठी कौतुकास्पद निर्णय घेतला आहे. त्यांनी जिल्हा परिषद सदस्य व स्थायी समिती सभापती या पदांवर २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कार्यकाळात मिळणारे मानधन, भत्ते व इतर देयके कुपोषित बालकांच्या कल्याणासाठी वापरण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि प्रशासनाला पत्र देत, स्वतःला कोणत्याही प्रकारचे मानधन, भत्ते किंवा देयके अदा न करता ती रक्कम जिल्ह्यातील कुपोषित बालके, गरजू विद्यार्थी तसेच त्यांच्या विकासासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य, खेळणी व इतर सुविधांसाठी खर्च करण्याचे आवाहन केले आहे.



सचिन गरड पाटील यांनी सांगितले की, नागरिकांनी टाकलेल्या विश्वासामुळे आम्हाला जनसेवेची संधी मिळाली आहे. त्यामुळे या पदांमधून मिळणारे आर्थिक लाभ स्वीकारण्याऐवजी ते पुन्हा समाजाच्या सेवेसाठी खर्च व्हावेत, हीच आमची भावना आहे. नागरिकांच्या कररूपी निधीतून मिळणारे मानधन पुन्हा त्यांच्याच हितासाठी वापरले जावे, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, " म रा ठ वा ड्या ची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांच्या आशीर्वादामुळे आम्हाला ही जबाबदारी मिळाली आहे. त्या ऋणातून उतराई होण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. जनतेची सेवा करण्याची संधी हेच आमच्यासाठी सर्वात मोठे समाधान आहे." सचिन गरड पाटील यांच्या या सामाजिक बांधिलकीच्या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# वेरुळ नगरीत उद्योग मंत्री उदय सावंत यांचे जंगी स्वागत



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सावंत शिवसेना जिल्हाप्रमुख व छत्रपती संभाजी नगर महानगर पालिका चे उपमहापौर राजेंद्र जंजाळ हे श्री क्षेत्र वेरूळ या ठिकाणी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग दर्शनासाठी आले असता वेरूळ नगरीचे सरपंच कुसुमताई प्रकाश पाटील मिसाळ व शिव सेना नेते माजी सरपंच प्रकाश पाटील मिसाळ मित्र मंडळाच्या वतीने उदय सावंत यांचा सत्कार करण्यात आला

# अभिजीत दीपके यांनी तथ्यांऐवजी दिशाभूल करू नये : किशोर शितोळे

## आरोपींवर कायदेशीर कारवाईला विरोध का?; काँग्रेसच्या भूमिकेवरही उपस्थित केले प्रश्न

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आंदोलनादरम्यान भाजपच्या कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा आरोप अभिजीत दीपके करत आहेत. जर तसे असेल आणि दिल्ली पोलिस संबंधित व्यक्तींचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करत असतील, तर त्या कारवाईला विरोध करण्याचे कारण काय, असा सवाल भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी उपस्थित केला आहे.

आंदोलनादरम्यान पोलिस कर्मचारी आणि पत्रकारांवर झालेला हल्ला, दगडफेक आणि हिंसाचार ही गंभीर बाब असून, अशा घटनांतील आरोपींवर कठोर कारवाईची मागणी करण्याऐवजी त्यांचे समर्थन केल्याचा आभास निर्माण करणारी विधाने अभिजीत दीपके करत असल्याचा आरोपही शितोळे यांनी केला.




हातात संविधान घेऊन बोलणाऱ्यांनी कायद्याचा सन्मान राखत हिंसाचार करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करणे अपेक्षित होते. मात्र तसे न करता दिशाभूल करणारी भूमिका घेतली जात असल्याने त्यामागील हेतूबाबत जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होत असल्याचे ते म्हणाले.

याशिवाय, अभिजीत दीपके काँग्रेसच्या भूमिकेशी सहमत नसतील, तर कर्नाटक आणि पंजाबमधील कथित पेपर लीक प्रकरणांबाबत संबंधित मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी ते कधी करणार, असा सवालही शितोळे यांनी उपस्थित केला. आंदोलनादरम्यान झालेली घोषणाबाजी, शिवीगाळ आणि त्यानंतर झालेल्या कथित जल्लोषाबाबतही अभिजीत दीपके यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी केली.

# शिवण्यात 250 वर्षांची गुरुसेवेची अखंड परंपरा; गुरुपौर्णिमेनिमित्त महोत्सव





**तभा वृत्तसेवा :**

**अजिंठा ३० जुलै :** शिवणा, ता. सिल्लोड छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिवणा हे गाव श्री गुरुपादुका संस्थानामुळे दत्तभक्तांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. गाणगापूर येथे जसा महिमा आहे, त्याचप्रमाणे दत्तरूपात सद्गुरु श्री बाळकृष्ण महाराजांच्या पावन वास्तव्यामुळे शिवण्याला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. गुरुपौर्णिमेचा उत्सव येथे गेल्या सुमारे २५३ वर्षांपासून अखंडपणे भक्तिभावाने साजरा केला जात असून ही परंपरा आजही अविरत सुरू आहे.

दत्तावतारी सद्गुरू श्री बाळकृष्ण महाराजांनी शिवणा येथे अध्यात्म, वेदांत, धर्मशास्त्र आणि गुरुभक्तीचा प्रसार केला. त्यांच्या कृपेने असंख्य गुरूभक्तांना गुरुमंत्र, आध्यात्मिक मार्गदर्शन दत्त महाराजांची कृपा आणि जीवनाला नवी दिशा मिळाली. त्यांच्या पवित्र चरणस्पर्शाने शिवणा हे गाव दत्तसंप्रदायातील महत्त्वाचे क्षेत्र बनले.

श्री बाळकृष्ण महाराजांनंतर श्री रामचंद्र महाराज आणि पुढे परंपरेतील पूजनीय गुरुवर्य प.पु. विनायक महाराज यांनी संस्थानची गौरवशाली परंपरा जतन केली. आजही श्री गुरुपादुका संस्थान, शिवणा येथे गुरु-शिष्य परंपरेचा दीप अखंड तेवत असून गुरुमंत्र दीक्षा, गुरुपादुका पूजन, वेदपठण, धार्मिक विधी आणि साधना सातत्याने सुरु आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त बुधवार, २९ जुलै २०२६ रोजी श्री गुरुपादुका संस्थान, शिवणा येथे गुरुपादुका पूजन, श्रींच्या पादुकांचा अभिषेक, प.पु सुभाषमहाराज यांचे मार्फत हजारो शिष्यांना गुरुमंत्र दीक्षा देण्याचा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या पवित्र सोहळ्यास हजारो भाविक उपस्थित राहून गुरुकृपेचा लाभ घेतला "गुरुकृपाच जीवनाची खरी संपदा आहे" या संदेशाने प्रेरित होऊन सर्व भाविकांनी या पवित्र गुरुपौर्णिमा महोत्सवात सहभाग नोंदविला .

## पर्यटन सहकार्यास नवी चालना

**पुणे :** छत्तीसगड टुरिझम बोर्डने फिक्कीच्या सहकार्याने पुण्यातील हयात रीजेन्सी येथे पर्यटन रोडशो आयोजित केला. या कार्यक्रमात छत्तीसगड व महाराष्ट्रातील टूर ऑपरेटर्स, हॉटेल व्यावसायिक आणि ट्रॅव्हल एजंट्स यांनी बी२बी चर्चेद्वारे पर्यटन क्षेत्रातील सहकार्याच्या संधींवर चर्चा केली. छत्तीसगडचा वारसा, वन्यजीव, आध्यात्मिक, साहसी आणि सांस्कृतिक पर्यटनाचा प्रचार करण्यासह राज्याला उदयोन्मुख पर्यटनस्थळ म्हणून प्रोत्साहन देण्याचा उद्देश या रोडशोमागे होता. कार्यक्रमात सांस्कृतिक सादरीकरण आणि नेटवर्किंग डिनरचेही आयोजन करण्यात आले.

## डिजिटल सुरक्षिततेसाठी एनपीसीआयची जनजागृती

**नाशिक :** भारतात डिजिटल पेमेंट्सचा वापर झपाट्याने वाढत असताना आर्थिक फसवणुकीच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. याच पार्श्वभूमीवर नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) ने नागरिकांना एसएमएसद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. एनपीसीआयच्या माहितीनुसार, अनेक आर्थिक फसवणुकीची सुरुवात एका बनावट एसएमएसपासून होते. हे संदेश बँका, सरकारी संस्था, कुरिअर सेवा किंवा इतर विश्वासार्ह संस्थांच्या नावाने पाठवले जातात. भीती, तातडी किंवा आकर्षक ऑफर्सचे आमिष दाखवून नागरिकांना बनावट लिंकवर क्लिक करण्यास, अनोळखी क्रमांकावर संपर्क साधण्यास, संशयास्पद ॲप डाउनलोड करण्यास किंवा ओटीपी, यूपीआय पिन, पासवर्ड यांसारखी गोपनीय माहिती शेअर करण्यास प्रवृत्त केले जाते.

## कमीप्रीमियममध्ये 10 वर्षांचे लाइफ कव्हर

**मुंबई:** आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल आयप्रोटेक्ट स्मार्ट प्लस आता 10 वर्षांच्यालाइफ कव्हर पर्यायासह उपलब्ध आहे. ही योजना अशा ग्राहकांसाठी तयार करण्यात आली आहेज्यांच्यावर गृहकर्ज, मुलांचे शिक्षण आणिव्यावसायिक कर्जे अशा जबाबदाऱ्या आहेत. यामुळे,ज्या काळात आर्थिक जबाबदाऱ्या सर्वाधिक असतात,त्या काळात ग्राहकांना कमी प्रीमियममध्ये चांगले लाइफ कव्हरनिवडणे या योजनेमुळे शक्य होते. आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सचे वितरण प्रमुख,श्री. भरत गुंटी म्हणाले, “जीवनातील ध्येयांनुसार ग्राहकांच्या आर्थिकसंरक्षणाबद्दलच्या अपेक्षा सातत्याने बदलत आहेत. आर्थिक प्रवासाच्या विविध टप्प्यांवरग्राहकांसाठी सर्वात महत्त्वाच्या असलेल्या गोष्टींचे रक्षण करण्यास मदत करणे,हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. आयसीआयसीआय प्रु आयप्रोटेक्टस्मार्ट प्लस हा आमचा ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन दर्शवतो. यात 10 वर्षांचीमुदत पॉलिसी असून, किफायतशीरपणाआणि महत्त्वपूर्ण आर्थिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी तयार केलेली वैशिष्ट्ये यांचामेळ साधला जातो.

## टाटा सॉल्ट खात्रीशीर शुद्धता

**३१ जुलै २०२६:** टाटा सॉल्ट या भारतातील आयोडीनयुक्त मीठ क्षेत्रातील अग्रणी आणि मार्केट लीडर कंपनीने अनिवार्य आयोडीन पातळीसह शुद्धतेचे सातत्यपूर्ण मानक प्रदान करून आपले स्थान अधिक दृढ करणे सुरू ठेवले आहे. प्रयोगशाळा चाचणीद्वारे सिद्ध झालेल्या, चाचणी केलेल्या १०० मीठांपैकी टाटा सॉल्ट सर्वाधिक शुद्धतेसह अव्वल ठरले आहे, ज्यामुळे गुणवत्ता शोधणाऱ्या कुटुंबांसाठी एक विश्वासार्ह पर्याय म्हणून त्याचे स्थान अधिक दृढ झाले आहे.ग्राहकांच्या कल्याणासाठी असलेल्या आपल्या कटिबद्धतेने प्रेरित होऊन टाटा सॉल्ट आपल्या उत्पादनांची कडक अंतर्गत आणि नियामक निकषांनुसार कठोर चाचणी करते. हे केवळ शुद्धतेची उच्च मानक सुनिश्चित करत नाही तर प्रत्येक पॅकमध्ये पुरेशा आयोडीन पातळीची सातत्यपूर्ण उपलब्धता देखील सुनिश्चित करते. ब्रँडचा हा दृष्टिकोन विश्वासू गुणवत्ता राखून दैनंदिन पोषणात अर्थपूर्ण योगदान देणारे उत्पादन देण्यावर लक्ष दर्शवतो.

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

गटर ड्रेनेज दुरुस्ती सन २०२६-२७ अंतर्गत

ई- निविदा सुचना क्रमांक : ६०४,६०५,६०६,६०७ /सन २०२६-२७

गटर ड्रेनेज दुरुस्ती सन २०२६-२७ अंतर्गत १ कामाची ई-निविदा सूचना क्र. : ६०४,६०५,६०६,६०७ सन २०२६-२७ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची सबंधितांनी नोंद घ्यावी.

सही/-

शहर अभियंता

अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

# भगवती विद्यालय बिडकीन येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि १ ऑगस्ट :** भगवती विद्यालय, बिडकीन येथे क्रांतिवीर लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम शाळेचे मुख्याध्यापक रायभान रक्ते यांनी दोन्ही विभूतीच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले,कार्यक्रमाची सुरवात केली. दोन्ही विभूतीन च्या महान कार्यावर विद्यार्थ्यांनी मनोगतातून प्रकाश टाकला, शेवटी अध्यक्षानी अण्णाभाऊचे जीवन खडतर असतांना ही लेखणीतून समजकरिता लढा दिला सांगितले श्रीधर जऱ्हाड यांनी लोकमान्य टिलकांचे स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हे उदगार सांगून प्रकाश टाकला. कार्क्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे यांनी केले तर आभार कमलाकर काळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील पवार, श्रीधर जऱ्हाड, सुभाष राठोड, अप्पासाहेब किसवे, विश्रांती सलगरे , आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले,

# कै.बाबुरावजी काळे शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ ऑगस्ट

कै.बाबुरावजी काळे शाळेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.त्यानंतर शाळेच्या २० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रा.निलेश पाटील होते.त्यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा आढावा मांडला.या महान विभूतींच्या जयंती आणि पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांनी काहीतरी बोध घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करावी असे त्यांनी स्पष्ट केले. या वेळी शाळेचे सहशिक्षक सागर पाटील,अरुणा घाटे, वैशाली खेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. इयत्ता ८ वीच्या विद्यार्थिनी कु.कश्मिरा पाटील,प्राची तायडे यांनी सूत्रसंचालन केले. या प्रसंगी प्रा.डॉ.दादासाहेब पवार, उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,पर्यवेक्षक सागर घाटे,प्रा. योगेश काळे,सहशिक्षिका मनिषा पाटील,सीता पगार,आशा गणगे,अंजली कथलकर,विद्या पाटील,शीतल जाधव, अरुणा भोई,रुपाली मानकर,रंजना जाधव,नलिनी पाटील, भाग्यश्री काळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्ञानेश्वर पंडित,संजय डापके,रमेश कंडारे, सुनीता जाधव,रुख्मिणी नेरपगार,लता गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# मैत्री ही मैत्रीच असते... तिच्यापेक्षा सुंदर दुसरे कोणतेही नाते नसते– रचना पहाडे



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** आपल्या आयुष्यात अनेक मित्र-मैत्रिणी असतात. शाळेतील मित्र, महाविद्यालयातील मित्र, क्लासमधील मित्र, जिममधील मित्र, किटी ग्रुपमधील मैत्रिणी आणि आता सोशल मीडियाच्या युगात फेसबुक, इन्स्टाग्राम अशा विविध माध्यमांवरही अनेक ओळखी निर्माण होतात. त्या सर्वांनाही आपण मित्र म्हणतो.

या अनेक मित्रांपैकी काही जणांना आपण "बेस्ट फ्रेंड" किंवा "बेस्टी" अशी वेगळी ओळख देतो. अशी एखादी व्यक्ती असते, जिच्याशी आपण आपल्या मनातील सुख-दुःख, भावना, स्वप्ने आणि गुपिते मनमोकळेपणाने शेअर करू शकतो. त्यामुळे ती व्यक्ती आपल्याला इतरांपेक्षा अधिक जवळची वाटते.

परंतु एक प्रश्न नेहमी मनात येतो—आपण मैत्रीत असा भेदभाव का करतो? "हा माझा मित्र आणि हा माझा बेस्ट मित्र" असे वर्गीकरण करण्याची खरंच गरज आहे का? कदाचित काहींना वाटेल की, यातच तर मैत्रीची मजा आहे. पण जर आपण आपल्या प्रत्येक मित्राकडे तितक्याच जिव्हाळ्याने पाहिले, प्रत्येक मैत्रीला तितकेच महत्त्व दिले, तर त्यात आपले काय नुकसान आहे?

खरं तर मैत्री ही मैत्रीच असते... तिच्यापेक्षा सुंदर दुसरे कोणतेही नाते नसते. मग तिला "बेस्ट", "क्लोज" किंवा इतर कोणत्याही श्रेणीत विभागण्याचा प्रयत्न कशाला? मनापासून जपलेली प्रत्येक मैत्री ही तितकीच मौल्यवान आणि सुंदर असते.

– रचना पहाडे (जैन), समाजसेविका

### भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था संस्थेची 28 वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

# पतसंस्था चालवणारे कर्मचारी व सभासद यांचे मोलाचे कार्य - चेअरमन प्रभाकर काळे

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१ ऑगस्ट :** सोयगाव येथील भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्यादित सोयगाव यांची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१ शनिवार रोजी सोयगाव येथील मराठी नॅशनल शाळा येथे सकाळी १०.०० वाजता सभा सुरु करून पतसंस्थेचे जेष्ठ सभासद रवींद्र काळे,माजी संचालक संजय शहापूरकर,कृष्णा आप्पा कुर्लेकर,भास्कर चौधरी हस्ते भैरवनाथ महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सभेला सुरुवात करण्यात आली.यावेळी संस्थेचे सर्व सभासद,प्रमुख अतिथी उपस्थित होते.


यावेळी संस्थेचे व्हाईट चेअरमन सतीश कोलते यांनी सभे पुढील येणारे विषय वाचून विषय मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत चा वृत्तांत वाचून कायम करणे,सन.२०२५-२६ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,सन.२०२५-२६ मध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे,सन.२०२५-२६ करिताचे संचालक मंडळांनी शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे,सन.२०२५-२६ करिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे,सन २०२५-२६ ऑडिट दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे,सन.२०२६-२७ करिता लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे बाबत,मे अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे बाबत याबाबतचे सर्व वाचून सभासदांना माहिती दिली,संस्थेचे सभासद ज्येष्ठ मार्गदर्शक संजय शहापूरकर यांनी संस्थेला २८ वर्षे पूर्ण झाले त्यानिमित्ताने त्यांनी पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे व कर्मचारी यांना फुलगुच्छ देऊन सत्कार केला.तसेच पतसंस्थेच्या वतीने आलेले प्रमुख पाहुणे यांचे सत्कार करण्यात आला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले समाजसेवक रवींद्र काळे,कृषी भूषण अरुण सोहनी,राजू दुतोंडे,भगवान वाघ,यांनी आपल्या भाषणेतून पतसंस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व काही सूचना ही पतसंस्थेला यावेळी दिल्या. तसेच संस्थेचे चेअरमन यांनी सभासदांना मार्गदर्शन करताना पतसंस्था मध्ये कर्मचारी व सभासद चांगले असले की पतसंस्थेला काही अडचण येत नाही व कर्मचारी व सभासदांनी असेच सहकार्य पतसंस्थेला कायम ठेवावे ही अपेक्षा व्यक्त पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी बोलताना केले.यावेळी ज्येष्ठ सभासद एकनाथ महाजन,शेख जावेद (बबलू भैय्या),समाजसेवक रवींद्र काळे,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे व्हा.चेअरमन योगेश बोखारे,राजू एलीस,स्वामी समर्थ पतसंस्थेचे मॅनेजर बाळू बोरसे,तिरुपती अर्बनचे मॅनेजर विकास देसाई,कृषी भूषण अरुण सोहणी,नगरसेवक हर्षल काळे,संतोष बोडखे,गजानन कुडके,अमोल मापारी,दिपक पगारे,किशोर मापारी,शेख रशीद शेख भिकन,प्रकाश बोर्डे,समाजसेवक दत्तू रोकडे,बंडू कळवत्रे,भगवान वाघ,भागवत थोटे,रमेश गव्हाचे,संतोष भोई,आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.यावेळी पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे,व्हा.चेअरमन संतिष कोलते,संचालक नारायण घनघांव,मच्छिंद्र तेली,पांडुरंग बारी,कदीर शहा,मोतीराम पंडित,दामोधर निकम,निर्मलाबाई महाजन,सुवर्णा दुसाने,सुनिता औरंगे,

व्यवस्थापक धनराज औरंगे,लिपिक विजय जावळे,शिपाई योगेश काळे,गोकूळ रोकडे,वसंत पठाडे,संध्या जगताप उपस्थित होते.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीष कोलते यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी केले.

# एमजीएममध्ये मशरुम लागवड कार्यशाळेची यशस्वी सांगता



**छत्रपती संभाजीनगर, दि.१:** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने पाच दिवशीय मशरूम लागवड प्रत्यक्ष अनुभवाधारित कार्यशाळचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्याला या कार्यशाळेत केरळ येथील कालिकत विद्यापीठाचे प्रो.डॉ.सी.गोपीनाथ यांनी ऑयस्टर मशरूम लागवड आणि स्पॉन निर्मिती या संदर्भात प्रशिक्षण दिले. कार्यशाळेत सहभागी जीवविज्ञान आणि कृषी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना या कार्यशाळेत बेड तयार करणे, मशरूमचे बी भरणे आणि मशरूम काढणीचे थेट प्रशिक्षण देण्यात आले.

पाच दिवशीय कार्यशाळा समारंभ कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सुधीर गव्हाणे, संचालिका डॉ.अर्चना पंचे, विभागप्रमुख डॉ.संजय हारके, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रो.डॉ.सी.गोपीनाथ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना कार्यशाळा प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी समन्वयक डॉ.नीलिमा गोरे आणि डॉ.अशोक शिंदे यांनी नियोजनबद्ध काम केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# पुनश्च ‘वंदे मातरम’!

‘वंदे मातरम’चा अपमान करणाऱ्यास अपराधी ठरवून संबंधितांस दंडित करण्याची तरतूद असलेला राष्ट्रीय गौरव अपमान प्रतिबंधक कायद्यातील दुरुस्ती विधेयकाला संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे ‘वंदे मातरम’ला ‘जन गण मन’ या राष्ट्रगीताच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त होणार आहे. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर तो लागू होईल आणि यापुढे ‘वंदे मातरम’चा अपमान करणाऱ्याला थेट तुरुंगात जावे लागेल. हे ऐतिहासिक असे विधेयक पारित करून घेतल्याबद्दल मोदी सरकारचे अभिनंदन केले पाहिजे.

‘जन गण मन’ हे आपले राष्ट्रगीत (नॅशनल अँथेम) तर ‘वंदे मातरम’ हे मातृभूमीची आराधना करणारे राष्ट्रीय गीत (नॅशनल साँग) आहे. आजही ‘वंदे मातरम’ गाताना आणि ऐकताना समस्त देशभक्तांच्या अंगावर रोमांच उभे राहतात. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या लेखणीतून साकारलेले हे गीत एके काळी स्वातंत्र्य आंदोलनाचा मूलमंत्र झाले होते. एका साध्या कवितेपासून सुरू झालेला ‘वंदे मातरम’चा प्रवास, उशिरा का होईना, कायदेशीर पद्धतीने राष्ट्रीय गीतापर्यंत पोहोचला, ही भारतभूमीवर प्रेम करणाऱ्या कोट्यवधी लोकांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

‘वंदे मातरम’ची जन्मकथा अतिशय रोचक आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय सरकारी अधिकारी होते. पश्चिम बंगालमधील एका रेल्वे प्रवासात गाडीतून बाहेरचे सृष्टिसौंदर्य न्याहाळत असताना चट्टोपाध्याय हरखून गेले आणि त्यांच्या अलौकिक प्रतिभेतून ‘वंदे मातरम’चा जन्म झाला. सुरुवातीला ही फक्त एक कविता होती. पुढच्या काळात हे गीत स्वातंत्र्य आंदोलनाचे प्रेरणागीत होईल, याची कल्पनाही त्यावेळी कुणी केली नसेल. चट्टोपाध्याय यांनी ‘आनंदमठ’ ही ऐतिहासिक कादंबरी लिहिली आणि तीत ‘वंदे मातरम’चा समावेश केला गेला. त्यानंतर ‘वंदे मातरम’चे महत्त्व वाढले. ‘वंदे मातरम’चा नारा देत हजारो स्वातंत्र्य संग्राम सैनिक हसत-हसत फासावर चढले. १८९६ मध्ये कलकत्ता येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या १२ व्या अधिवेशनात पहिल्यांदा हे गीत गायिले गेले. त्यानंतर ते देशभर प्रसिद्ध झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी या गीताला संगीत दिले आणि गायिलेही. ते गीत ‘हे आई (मातृभूमी), मी तुला वंदन करतो’ या भावनेच्या पल्याड जाऊन स्वातंत्र्य आणि राष्ट्रवादाचा प्रखर स्वर बनले. बंगालच्या फाळणीनंतर ‘वंदे मातरम’ने राष्ट्रवादाची भावना देशवासीयांमध्ये तीव्रतेने जागृत केली. लोक एकमेकांना अभिवादन करण्यासाठी ‘वंदे मातरम’चा वापर करू लागले. त्यात हिंदू-मुस्लिम असे सारेच होते. १९०५ मध्ये ‘वंदे मातरम’ हा स्वदेशी आंदोलनाचा मुख्य नारा झाला. वंगभंग आंदोलन आणि असहकार आंदोलनात ‘वंदे मातरम’ने प्रभावी भूमिका पार पाडली. या गीताचा जनमानसावरील प्रभाव एवढा वाढला की, इंग्रजांना त्यावर बंदी घालावी लागली. मॅडम भिकाजी कामा यांनी १९०७ मध्ये जर्मनीच्या स्टुटगार्ट येथे पहिल्यांदा तिरंगा फडकावला, तेव्हा त्याच्या मध्यभागी देवनागरीत ‘वंदे मातरम’ असे लिहिले होते. त्यानंतर या गीताने स्वातंत्र्य लढ्यात जागविलेल्या चैतन्याचा परिणाम इतिहासात नोंदविला गेला आहे.

२०२५ मध्ये ‘वंदे मातरम’ला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मोदी सरकारने देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. आता तर सर्व शासकीय कार्यक्रमात ‘वंदे मातरम’ आणि ‘जन गण मन’ अशी दोन्ही गीते वाजवली जातात. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ‘जन गण मन’ आणि ‘वंदे मातरम्’ यांपैकी कोणत्या गीताला सर्वोच्च राष्ट्रीय गीत मान द्यायचा, यावर चर्चा झाली. दोन्ही गीतांनी भारतीयांच्या राष्ट्रभावनेला प्रेरणा दिली असल्याने एका गीताची निवड करणे सोपे नव्हते. अखेरीस २४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ‘जन गण मन’ हे राष्ट्रगीत (नॅशनल अँथेम) म्हणून घोषित केले, तर स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक योगदानाची दखल घेत ‘वंदे मातरम्’ला समान सन्मान व राष्ट्रीय दर्जा बहाल करण्यात आला. ‘जन गण मन’ला जो सन्मान आहे, तोच आणि तेवढाच सन्मान ‘वंदे मातरम’लाही मिळाला पाहिजे, असे डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी जाहीर केले होते. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी १९११ मध्ये ‘जन गण मन’ लिहिले होते. त्यापूर्वीच सर्वमुखी झालेल्या ‘वंदे मातरम’चा भारतीय जनमानसातील प्रभाव कायम राहिला. तो वाढतही गेला. २००२ मध्ये बीबीसी वर्ल्ड सर्व्हिसने जागतिक पातळीवरील लोकप्रिय गीतांबाबत एक सर्वेक्षण केले असता ‘वंदे मातरम’ हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे लोकप्रिय गीत असल्याचे दिसून आले. ‘वंदे मातरम’ स्वातंत्र्य आंदोलनात क्रांतिकारकांनी केलेल्या बलिदानाचे स्मरण करून देणारे आहे. देशात एकता आणि अखंडतेची भावना निर्माण करते तसेच नागरिकांना देशभक्तीचे धडे देताना कर्तव्याची आठवणही करून देते. काँग्रेसच्या राजवटीत ‘वंदे मातरम’ची सर्वाधिक उपेक्षा करण्यात आली. त्या गीताला जाणीवपूर्वक सन्मानापासून वंचित ठेवले गेले. कारण एका विशिष्ट समुदायाला देशाला आई किंवा देव म्हणणे मंजूर नव्हते. खरे तर कोलकात्यात झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात ‘वंदे मातरम’ पहिल्यांदा जाहीरपणे गायिले गेले होते. त्याचे भान स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसच्या नेतृत्वाला ठेवता आले नाही. मोदी सरकारने या पृष्ठभूमीवर ‘वंदे मातरम’साठी कायदेशीर तरतूद केली, हे समजून घेतले पाहिजे. कोणत्याही नागरिकाला ‘वंदे मातरम’ वा ‘जन गण मन’ गाण्यास बाध्य केले जाऊ शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात म्हटले होते हे खरे. मात्र, एखाद्या राष्ट्रीय सन्मानाच्या प्रतीकाचा आदर न करू पाहणाऱ्याला त्याचा अपमान करण्याचा परवाना मिळत नाही, याचेही भान ठेवले पाहिजे.

‘वंदे मातरम’ दुरुस्ती विधेयकावरील चर्चेवरून काँग्रेसने नेहमीच राजकारण करण्याचा प्रयत्न केला. ‘वंदे मातरम’बद्दल सर्व लोकांच्या मनात आदराची भावना असल्यामुळे असे विधेयक आणण्याची गरजच नव्हती, असा दावा करत काँग्रेसने मुस्लिम तुष्टीकरणाच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला होता. अप्रत्यक्षपणे काँग्रेसने या विधेयकाला विरोधच केला. अशा तत्त्वांना जागेवर आणण्यासाठी सरकारला यासंदर्भात दंडात्मक कारवाईचे विधेयक आणावे लागले, ही वस्तुस्थिती आहे. मुस्लिम समाजातील बहुसंख्य लोक अजूनही ‘वंदे मातरम’ला सन्मान देत नाहीत, ते गात नाहीत. याचे कारण आहे त्यांचा धार्मिक विश्वास. इस्लामचा फक्त अल्लाहवर एकेश्वरवादी स्वरूपाचा विश्वास आहे. त्यामुळे इबादत म्हणजे पूजा, प्रार्थना, साष्टांग प्रणाम हा फक्त अल्लाहसाठी अशी त्यांची धारणा आहे. अल्लाहशिवाय इतर कुणाची पूजा वा नमस्कार करणे इस्लाममध्ये पाप मानले जाते. ‘वंदे मातरम’मध्ये तर मातृभूमीला दुर्गा आणि लक्ष्मीच्या रूपात दाखवले आहे. भारतात दैवतांना विविध रुपांत पाहण्याची व त्यांची आराधना करण्याची परंपराच आहे. आजवर एका विशिष्ट समाजाकडून आणि त्यांच्या मतांवर डोळा असलेल्या राजकीय शक्तींकडून ‘वंदे मातरम’चा जाणीवपूर्वक अपमान करण्यात येत होता त्यामुळेच सरकारला ‘वंदे मातरम’चा अपमान हा दंडनीय अपराध असल्याचा कायदा करावा लागला. ज्या देशात तुम्ही राहता, त्या देशाला मातृभूमी मानणे ही साऱ्या दुनियेतील रीत असेल तर विशिष्ट समुदायाने या देशाच्या मातीला आई समजून वंदन करण्यास नकार देणे हे देशाच्या अखंडतेला बाधक आहे. त्यामुळेच उपरोक्त दुरुस्ती विधेयकाचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे. अशी गीते राष्ट्रीय अस्मितेचा विषय असतात आणि अस्मितेचा पाया ठिसूळ असलेल्या राष्ट्रांची प्रगती नागरिकांच्या मानसिक ऐक्याविना कुंठित होत असते, हे लक्षात ठेवून पुनश्च ‘वंदे मातरम’चा नारा सतत बुलंद केला पाहिजे. ■

## प्रासंगिक

# वनवासींच्या भवितव्याशी आयुष्यभराचे नाते

**विवेक गिरिधारी**

**प्रमोदराव व रंजनाताई करंदीकर हे ध्येयवादी हे दाम्पत्य गेली चार दशके वनवासी जनजाती समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी झटत आहे. त्यांच्या या निरलस कामाची दखल घेत पुण्यातील सरस्वती मंदिर संस्थेतर्फे त्यांना शनिवार, १ ऑगस्ट २०२६ रोजी ‘सेवाव्रती जीवनगौरव पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्यात येत आहे. यानिमित्त...**



प्रमोदराव व रंजनाताई करंदीकर या ध्येयवादी दाम्पत्याने गेली चार दशके वनवासी समाजाच्या उत्थानाशी, भवितव्याशी आपले नाते सांगत एक आगळे-वेगळे जीवन जगण्याचा जाणीवपूर्वक प्रामाणिक प्रयत्न केला आहे. सुरुवातीला वनवासी कल्याण आश्रम व नंतर शबरी सेवा समिती या माध्यमातून त्यांनी गेली ४४ वर्षे समर्पण भावनेतून वनवासी जनजाती समाजासाठी काम केले आहे. या निरलस व निःस्वार्थ जीवनप्रवासाची दखल घेत पुण्यातील सरस्वती मंदिर संस्थेतर्फे त्यांना ‘सेवाव्रती जीवनगौरव’ पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. संस्थेला १०० वर्षे पूर्ण झाल्यानंतर २०२३ मध्ये या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली. आयुष्यभर समर्पित भावनेने सेवाकार्यासाठी झोकून देऊन काम करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येत आहे. शाल, श्रीफळ व काम करणाऱ्या संस्थेसाठी रु. ५१ हजार देणगी स्वरूपात दिले जातात.

प्रमोद करंदीकर हे मूळचे धुळ्याचे. त्यांचा जन्म १७ फेब्रुवारी १९५७ मध्ये झाला. शिक्षण एम. कॉम.पर्यंत असून सर्व शिक्षण धुळ्यातच झाले. त्यांचे काका १९४६ मध्ये प्रचारक म्हणून निघाले होते. आणिबाणीच्या काळात त्यांच्या वडिलांना व मोठ्या भावाला अटक होऊन ते १९ महिने कारागृहात होते. तरुण वयात संघाच्या मुशीतच त्यांच्या ध्येय व धारणा पक्क्या झाल्या होत्या. आणिबाणीच्या काळात महाविद्यालये बंद असल्याने श्रीगुरुजींचे विचारधन आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे एकात्म मानवदर्शन वाचून काढले. या काळात संघशाखा बंद झाल्या तेव्हा तो तालमीत हिरीरीने सहभागी होऊ लागला. आजोबांचे कुस्तीप्रेम त्याच्यात उतरले होते. एम. कॉम. दुसऱ्या वर्षाला असताना धडगाव येथील वनवासी विद्यार्थी वसतिगृहावर दोन आठवडे राहण्याचा योग आला. त्यादरम्यान वनवासी समाजाची विपन्नावस्था व विदारक स्थिती याचे दर्शन झाले. वनवासी समाजासाठी पुढील आयुष्यात काम करायचं हा विचार तिथेच प्रथम मनाशी पक्का झाला.

वनवासी कल्याण आश्रमाचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै. बाळासाहेब दीक्षित यांच्याशी परिचय झाल्यावर त्यांच्या सूचनेनुसार प्रमोदने कल्याण आश्रमाच्या कामात प्रत्यक्ष सहभागी होण्यास १९७८ मध्ये सुरुवात केली. सुरुवातीला पूर्वोत्तर भारतात वर्षभराच्या कामानंतर त्यांच्यावर कर्जतजवळील वैजनाथ येथे वनवासी मुलांचे वसतिगृह चालू करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. १९८१ च्या दरम्यान जबलपूरच्या सुशीलाबाई ताम्हणकर या वैजनाथ येथे वास्तव्यास आल्या. तेथे मुलींचेही वसतिगृह चालू झाले. त्यांच्या मदतीला कर्जत येथून बी.ए. च्या शेवटच्या वर्षाला शिकणारी रंजना गांगल ही युवती कार्यकर्ती येऊ लागली. एके दिवशी सुशीलाताईंनी प्रमोदजवळ सहजपणे पण सहेतूक लग्नाचा विषय काढला व रंजनाचे नावही सुचविले. प्रमोद मग ठरवून रंजनाशी लग्न या विषयावर मोकळेपणाने व स्पष्टपणे बोलला. आयुष्यभर नोकरी वगैरे न करता साधेपणाने राहून पूर्णवेळ सामाजिक काम करणार असल्याचा मनोदय व निग्रह त्याने रंजनाजवळ व्यक्त केला. दोघे १३ ऑगस्ट १९८२ रोजी विवाहबद्ध झाले आणि पाचव्या दिवशी वैजनाथ केंद्रावर हजरही झाले.

जून १९८६ मध्ये वैजनाथ केंद्र बंद करून कोठींबे येथेच मुलींचेही वसतिगृह हलविण्यात आले. वसतिगृह स्थिरावल्यावर कृषी विकासाचे व फलोद्यानाचे प्रयोग चालू झाले. पावसाळ्यात भाजीपाला लागवड केली जाऊ लागली. एक कुक्कुटपालन केंद्रही सुरू करण्यात आले. खांदन गावात भाजीपाला लागवड गट तयार करण्यात आला. कल्याण आश्रमातर्फे अखिल भारतीय स्तरावर क्रीडा स्पर्धा भरवायचे ठरविले गेले. कल्याण आश्रमाच्या वाढत्या कामासाठी आता प्रांतभर फिरण्याची गरज होती. जून १९८९ पासून प्रमोदराव वैजनाथ-कोठिंबे हा १० वर्षांचा अध्याय संपवून डोंबिवलीत राहण्यास आले. प्रांत प्रकल्प प्रमुख म्हणून नवीन जबाबदारी त्यांच्यावर आली. वर्ष २००० मध्ये प्रमोदरावांकडे ग्राम विकासाची अखिल भारतीय जबाबदारी सोपविण्यात आली.

रंजनाताई यांच्याकडेही महाराष्ट्र प्रांताची महिला प्रमुख, पश्चिम उत्तर क्षेत्राची म्हणजे आठ प्रांतांची क्षेत्रीय महिला प्रमुख म्हणून जबाबदारी आली.

विविध प्रांतात वनवासी क्षेत्रात प्रवास करताना ठळकपणे लक्षात आलेली बाब म्हणजे बालकांचे कुपोषण व बालमृत्यूचे वाढते प्रमाण. त्यातून शबरी सेवा समिती या स्वतंत्र रचनेचे बीज रोवले गेले. ९ सप्टेंबर २००३ रोजी शबरी सेवा समितीची रीतसर नोंदणी करण्यात आली. कर्जत तालुक्यातील तेलंगवाडी येथे महिला व मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करून शबरीच्या कामाचा श्रीगणेशा झाला. त्या अंतर्गत विविध उपक्रमांसह गर्भवती महिलांची तपासणी केली जात असे. यासाठी शबरीचे अध्यक्ष डॉ. नीलकंठ फडके आवर्जून उपस्थित असत. पुढे नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव आणि अक्कलकुवा या परिसरात हे काम विस्तारण्यास मदत केली. शहादे येथील बालरोगतज्ज्ञ डॉ. अलका कुलकर्णी यांनी १० वर्षे आपल्या रुग्णालयात शबरी सेवा समितीच्या माध्यमातून आलेल्या कुपोषित बालकांवर मोफत उपचार केले. सोबतच आदिवासींचे सामूहिक विवाह समारंभ घेण्यात आले. शबरी समितीने इयत्ता पहिली ते चौथी या वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका चालू केल्या असून ७५ हून अधिक ठिकाणी या अभ्यासिका चालतात. याला जोड देत १२ ठिकाणी शिवणकाम प्रशिक्षण वर्गातून ८०० हून अधिक महिलांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. जव्हार तालुक्यात १८ हजारांहून अधिक आंबा कलमांची तर धुळे परिसरातील अक्कलकुआ येथे ५० हजार साग रोपांची लागवड करण्यात आलेली आहे. आदिवासी पाड्यांवरील ६१ सामुदायिक विहिरी शबरीने शेतीसाठी लोकसहभागातून खोदल्या आहेत. अशाच प्रकारे लोकसहभागातून ४० पाड्यांवर पाणी उपसा सिंचन योजना राबविण्यात आल्या असून त्यातून सुमारे १४०० एकर शेतजमिनीला सिंचनाची हमी मिळाली आहे.

आज दोघेही जण सत्तरीच्या उंबरठ्याच्या अलिकडे उभे आहेत; पण सतत वाढत्या कामाची स्वप्ने बघत आहेत. सामाजिक जाण आणि भान असणारा मुलगा आदित्य व सून मानसी असल्यामुळे हे साधते आहे. स्वतःच्या संसाराची सुरुवात वनवासी भागात राहायला जाऊन करणारे हे दाम्पत्य आजही ४४ वर्षांनंतर तन-मनाने वनवासींच्या सोबतच आहे. त्यांच्याच आशा-आकांक्षाशी एकरूप झालेले आहे. ■

९४२२२३१९६७

## वेध

# कुळाचाराचे करायचे काय?

**सोनाली पवन ठेंगडी**

आषाढी पौर्णिमेपासून आपल्या सणावारांची जी मालिका सुरू होते ती थेट चंपाषष्ठीपर्यंत कायम असते. बहुतांश सण हे कुळाचारिक असतात. काही जणांकडे अगदी होळीसुद्धा कुळाचारिक सण असतो. पण, चातुर्मासातील सणांचा दणदणाट आणि झगमगाट काही औरच असतो. आखाडीच्या पुरणपोळीपासून कुळाचार सुरू झाला की फुलोरा, मेहुण जेऊ घालणे, अमूक एक पदार्थच करणे असे सगळे सोपस्कार पार पडत असतात. गेल्या काही वर्षांत या सर्व ‘सक्ती’च्या कार्यक्रमांना जोड मिळाली आहे ती तणावाची. कुळाचारिक सण म्हटला की घरातील कर्त्या मंडळींना प्रचंड ताण येतो. विशेषतः घरातील गृहिणीला सण म्हणजे शिवधनुष्य उचलण्यासारखं वाटत असतं.

अर्थात, याला कारणंही तशीच आहेत. एकतर घरातील गृहिणी आता घराबाहेर जाऊन काम करते. तिच्यासाठी रोजचा दिनक्रम म्हणजे तारेवरची कसरतच! त्यात पुन्हा सणवार म्हटले की जास्तीचे काम, पूर्वतयारी, चार लोकांना जेवायला बोलवायचे हे सर्व आलेच. सर्वात मोठी बाब असते ती खर्चाची. पूर्वी सण म्हटले की मोठे कुटुंब असल्याने अनेक जण मदतीला असायचे. सर्वजण मिळून काम करायचे. आता नात्यांमध्ये ‘इगो’ हा विषय जरा जास्तच सोकावला आहे. मी कशाला मदतीला जाऊ, मी इतकेच काम का करू, दुसऱ्यांच्या स्वयंपाकघरात काम सुचतच नाही अगदी इथपर्यंत मुद्दे असतात. शिवाय, घरात एक-दोनच अपत्य, तेही आपआपल्या गुंत्यात... या आणि अशा असंख्य प्रश्नांचा झंझावात असतो. परिणामी कुळाचारिक सणांमध्ये आपण शॉर्टकट मारायला सुरुवात केली; काळानुरूप बदल हवेच म्हणत इतरांनाही ते स्वीकारायला भाग पाडले. इथवर विषय स्वीकारता येण्यासारखा आहे. पण, याही पलीकडे जाऊन नवीन पिढीपर्यंत कुळाचार पोहोचविणे हा विषय जरा कठीणच होतोय. मुले दुसऱ्या शहरात, दुसऱ्या देशात वास्तव्यास असतात. ते आपोआपच या जबाबदारीतून सुटतात. यामुळं होतं काय की, आपल्या सणावारांपासून आपलीच नवीन पिढीची नाळ तुटतेय हे जेवढं खेदजनक आहे, तेवढंच चिंताजनकही ठरू पाहतंय.

मुळात, आता जे घरात कर्ते लोक आहेत त्यांनी नवीन पिढीला कुळाचारिक सण ओझं न वाटता त्याचा आनंद कसा घेता येईल, हे पटवून देणं गरजेचं आहे. मात्र, घडतंय काही वेगळंच. कर्ते लोकच कुळाचारिक सणांना वैतागल्यासारखे दिसतात. मग ते तडजोड स्वीकारतात. ही तडजोड काळानुरूप आणि आर्थिक विषयाशी निगडित असेल तर योग्यच; पण सरसकट सण करायचाच नाही, असे घडायला नको. छोट्या प्रमाणावर करा, त्यातील कुळाचारातील काही गोष्टींना तज्ज्ञांच्या मदतीने कमी-जास्त करा.

आता मूळ मुद्दा असा की, कुळाचाराचे बंधन वाटत असेल तर काय करायचे? यावर तज्ज्ञ मंडळी सांगतात की, कुळाचार हा सक्तीचा विषय आजच्या काळात राहूच शकत नाही. मात्र, कुळाचारात सांगितलेले नियम शक्य तितके पाळले तर त्यापासून कोणतीही हानी नक्कीच नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर सोवळे हा प्रकार आता कालबाह्य वाटू लागला आहे. हरकत नाही. मूळ उद्देश लक्षात घ्या. उद्देश स्वच्छता, शूचिता हा होता. म्हणून स्वच्छ धुतलेले कपडे घालूनही केलेला नैवेद्य देवाला स्वीकारार्ह राहीलच. हा बदल आता बहुतांश घरात स्वीकारलेला आहे. कोणी म्हणेल की, नाहीच केले सण तर काय बिघडणार आहे? अजिबात काही बिघडत नाही. पण, फक्त कल्पना करा की, आपल्या जगण्यातून जर हे सणवार काढून टाकले तर उरेल तरी काय? या सणांमधील आनंद शोधण्याचा आपण प्रयत्न का करत नाही? पाश्चिमात्यांचे वेगवेगळे ‘डे’ अर्थात दिवस आपण साजरे करतो. पण, आपले सणवार नको, हे कसे?

विशेष म्हणजे, आपल्या प्रत्येक सणामागे काही ना काही सामाजिक, कौटुंबिक आणि अगदी पर्यावरणविषयक असे उदात्त हेतू आहेत. ते सांगायचे तर तो स्वतंत्र लेखाचा विषय ठरेल. पण, एक गोष्ट नक्की की, आपले सणवार केवळ आनंदाचा किंवा देवाधर्माचा विषय नाही तर ते आपले सामाजिक आणि सांस्कृतिक दायित्व आहे. हा वसा आपल्या हाती आपल्या संस्कृतीने दिलेला आहे, जो आपल्याला नव्या पिढीपर्यंत चांगल्या स्थितीत पोहोचवायचा आहे. सणवार आणि त्यातील कुळाचार हे केवळ आनंदाचे दिवस नसून संस्कृती, परंपरा, कुटुंब, समाज आणि निसर्ग यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहेत. ते साजरे करताना त्यांच्या मागील मूल्यांचा स्वीकार करून आनंदाची उधळण व्हायला हवी. हा आनंद, समाधान आणि सलोखा हीच खरी भारतीय संस्कृतीची ओळख आहे. हा आनंद नव्या पिढीलाही मिळायलाच हवा. ■

९४०३२११६७३

## मुंबई वार्तापत्र

# सुनेत्रा पवारांवरच्या टीकेचा अर्थ...

**नागेश दाचेवार**

महिलांच्या सक्षमीकरणाच्या घोषणा देणारे आणि संसदेत महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा असल्याचे सांगणारे विरोधी पक्ष महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांवर सातत्याने वैयक्तिक टीका करत असतील, तर त्याला राजकीय दुटप्पीपणा म्हणायचा की महिलांविरोधातील पूर्वग्रह? असा प्रश्न आता जनतेसमोर उभा ठाकला आहे. एका बाजूला महिला आरक्षणासाठी नक्राश्रू ढाळायचे आणि दुसऱ्या बाजूला राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांना लक्ष्य करून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचे षडयंत्र रचायचे, ही विरोधकांची भूमिका, विरोधाभास उघडपणे समोर आला आहे. सुप्रिया सुळेंना मुख्यमंत्री, पक्ष प्रमुख होण्याचं स्वप्न पाहणाऱ्यांनी, महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देण्याऐवजी, खच्ची करण्याचे राजकारण करणे हा देखील विरोधाभासच म्हणावा लागेल.

‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ (महिला आरक्षण विधेयक) याचे उद्दिष्ट लोकसभा, राज्यांच्या विधानसभा आणि दिल्ली विधानसभेतील थेट निवडून येणाऱ्या जागांपैकी ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवणे, हे आहे. हे विधेयक देशाचे राजकीय चित्र बदलण्याची आणि राजकारणात महिलांचे वाढीव प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याची संधी देते. हे विधेयक मंजूर होण्यासाठी संसदेत आवश्यक त्या दोन तृतीयांश पाठिंब्याची गरज असली, तरी त्यामागील मूळ उद्देश साध्य करण्यासाठी खऱ्या राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. जर महिलांच्या नेतृत्व क्षमतेवरच वारंवार आणि अवाजवी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असतील तर महिला सक्षमीकरणाची भावनाच अर्धवट राहील.

महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांची नियुक्ती हा राज्याच्या निवडणूक-राजकीय प्रवासातील एक महत्त्वपूर्ण आणि अपरिहार्य घटना ठरली आहे. त्यांची या पदावरची नियुक्ती म्हणजे महिलांना प्रतिनिधित्व देण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल.



एक महिला राजकारणातल्या आव्हानांचा सामना करू शकते, पुढाकार घेऊन नेतृत्व करू शकतात, हे त्यांनी दाखवून दिले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढत, सुनेत्रा पवार राज्याच्या राजकारणात एक निर्णायक शक्ती म्हणून पुढे आल्या. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्यापूर्वी, त्यांनी राज्यसभेत नामनिर्देशित खासदार म्हणून काम पाहिले होते. आपल्या संसदीय जबाबदाऱ्यांबाबत त्यांनी दृढ निष्ठा दर्शविली आहे. राज्यसभेच्या कार्यकाळात त्यांनी १२६ प्रश्न उपस्थित केले, जी ९२, या राष्ट्रीय सरासरीपेक्षा कितीतरी अधिक आहे. महात्मा जोतिराव आणि सावित्रीबाई फुले यांच्यापासून प्रेरणा घेऊन, महाराष्ट्राने महिलांमध्ये शिक्षण आणि सामाजिक न्यायात समानतेचा पुरस्कार केला आहे. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांची नियुक्ती, हा त्याच वारशाचा पुढचा टप्पा आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे म्हणजे महाराष्ट्राच्या समाजसुधारकांनी निर्माण केलेल्या आदर्शांना छेद आहे.

### विरोधी पक्षांची दुटप्पी भूमिका

प्रियांका वढेरा, सुप्रिया सुळे आदी विरोधी आघाडीतल्या प्रमुख महिला नेत्यांनी वारंवार महिलांच्या अधिक प्रतिनिधित्वाची मागणी केली आहे. सुप्रिया सुळेंनी तर महिला आरक्षण विधेयक लागू करण्यास होत असलेल्या विलंबावर सातत्याने आवाज उठवला आहे. प्रियंका वढेरांनीही महिला सक्षमीकरणाच्या खंबीर पुरस्कर्त्या म्हणून स्वतःची प्रतिमा निर्माण केली आहे. उत्तर प्रदेशच्या मागच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी ‘लडकी हूँ, लड सकती हूँ..’ ही घोषणा दिली होती. पण, सुनेत्राताईंच्या बाबतीत मात्र, त्यांना त्यांच्यात ‘महिला’ दिसत नाही. त्यांना पाठिंबा देण्याऐवजी त्यांच्याबाबतीत गैरसमज पसरवणे, त्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य करणे, सातत्याने वैयक्तिक टीका करणे यांसारख्या गोष्टी या मंडळींकडून सुरू असतात.

लोकशाहीत निकोप चर्चेचे नेहमीच स्वागत केले जाते. मात्र, अलिकडच्या घडामोडींवरून असे दिसून येते की, राष्ट्रवादी काँग्रेसविरुद्ध नकारात्मक बातम्या पेरण्याचे एक पद्धतशीर षडयंत्र सुरू आहे. ज्याचा उद्देश सुनेत्रा पवार पक्ष सांभाळण्यास असमर्थ आहेत, अशी त्यांची प्रतिमा निर्माण होईल. सुनेत्रा पवार यांनी जानेवारी २०२६ मध्ये पदभार स्वीकारला. त्यांना पुरेसा वेळ दिल्यानंतर, त्यांच्या कारभाराच्या आणि धोरणात्मक निर्णयांच्या आधारेच त्यांच्या नेतृत्वाचे मूल्यमापन करणे योग्य आहे. पण तसे न करता त्यांच्याविरोधात संभ्रम निर्माण केला जात आहे. सुनेत्रा पवार यांना लक्ष्य केवळ त्या महायुतीसोबत आहेत म्हणून केले जात आहे. जर का त्या महाविकास आघाडीसोबत असत्या तर त्यांना हेच लोकं डोक्यावर घेऊन नाचले असते.

इंडिया आघाडी सध्या सर्वात कठीण टप्प्यातून जात आहे. महिला आरक्षणाला विरोध करणे राजकीयदृष्ट्या टिकण्यासारखे नाही, याची जाणीव आता प्रादेशिक पक्षांनाही होऊ लागली आहे. आघाडीतील डीएमके आणि राष्ट्रवादी (शप) यासारखे प्रमुख घटकपक्ष भाजपाच्या जवळ येत आहेत. या वास्तवामुळे राजकीय समीकरणे बदलू लागली असताना, आपली बदलती भूमिका स्पष्ट करण्याऐवजी या मंडळींनी विशिष्ट नेत्यांभोवती वाद निर्माण करण्याचा मार्ग निवडला आहे. सुनेत्रा पवार यांच्यावरील शाब्दिक हल्ले म्हणजे या अस्वस्थ करणाऱ्या वास्तवापासून राजकीय सुटका करून घेण्याचा एक प्रयत्न आहे. खोटे नरेटिव्ह सेट करणे, निवडक नेत्यांना लक्ष्य करणे आणि सातत्याने वैयक्तिक टीका करणे या सर्व गोष्टी इंडिया आघाडीची कमकुवत होत चाललेली अंतर्गत एकता झाकण्याचा प्रयत्न आहे. नजीकच्या काळात हा प्रयत्नही विफल झालेला दिसेल. ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### पावसाचे रौद्र रूप आणि हाहाकार

मंगळवारी पावसामुळे नागपुरात हाहाकार उडाला. ढगफुटीसारखा अचानक तीव्र स्वरूपाचा पाऊस कोसळला आणि नागरिकांना संकटात टाकले. संपूर्ण शहर जलमय झाले होते. अवघ्या काही तासांत तब्बल १७९.७ मिमी इतक्या विक्रमी मुसळधार पावसाची नोंद झाली. त्यातला १०४.५ मिमी पाऊस तीन तासांत कोसळला. रस्त्यांवर पूरसदृश स्थिती निर्माण झाली. खामल्यातील सोमलवार शाळेच्या मैदानात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. जवळपास ८०० विद्यार्थी शाळेत अडकले होते. प्रशासकीय यंत्रणा आणि नागरिकांच्या मदतीने मानवी साखळी आणि जाड दोरखंड वापरून विद्यार्थ्यांना शाळेतून रस्त्यापर्यंत आणण्यात आले. स्वावलंबीनगरात नाल्याचे घाण पाणी विहिरीत आणि पाण्याच्या टाक्यांत घुसले. नागरिकांच्या घरात पाणी शिरले आणि मौल्यवान वस्तूंचे नुकसान झाले. वरिष्ठ नागरिकांना फार त्रास सहन करावा लागला. घराच्या अंगणात ठेवलेले एलपीजी सिलेंडर्स पुराच्या पाण्यासोबत वाहून गेले. पावसाचे विक्राळ आणि भेसूर चेहरा बघायला मिळाला. या पावसाला ‘बरखा रानी’ असं न म्हणता ‘बरखा बैरन’ म्हणणे जास्त सयुक्तिक ठरेल.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

■■■

### देवपूजा आणि फुले

मॉर्निंग वॉक आणि देवाच्या पूजेसाठी फुले हा जणू सिद्धांत मांडलेला दिसतो. अर्थात त्याला बरेच जण अपवाद असतीलही; परंतु काही जणांची खोड अशी असते की, आपल्या घरी कितीही फुलबाग फुललेली असली, तरी चालता येता जाता कुठे दगडावर चढून, कुठे वाकून, कुठे कुंपण वाकवून हात घालून फुले तोडून नेणे हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे असे भासवत फुलं तोडल्यावर विजयश्री भाव यांच्या चेहऱ्यावर झळकत असतात. एक आजोबा रोज पहाटे आपण शिकारीवर चाललो आहोत, अशा आविर्भावात आपली दांडीची काठी घेऊन मोहिमेवर निघायचे. बरोबर फुलांसाठी पॉलीथिनची कॅरीबॅग. त्यांची प्रॅक्टीसही जोरात झाली असली पाहिजे. कारण त्यांच्या कॅरीबॅगमध्ये फुलांचं गोकुळ नांदत असायचं. लाल, पांढरे, पिवळे, निळे रंग असायचे. त्यांची नजर कायम प्रत्येकाच्या अंगणात भिरभिरताना दिसायची. कितीही आतल्या बाजूला असलेले चांगले फूल शिताफीने आपल्याकडे वळवून या महाराजांच्या पिशवीचे मानकरी होत असत. याला प्रवृत्ती म्हणावी की विकृती. एखाद्या घराची मालकीण आपल्या बागेतल्या फुलांना मोठे होताना बघत आनंदित होत असते. त्या फुलांना आंजारून-गोंजारून त्याची मशागत करते आणि एखाद्या फाईन मॉर्निंगला तिचे लक्ष जाते तर काय? फांदी वाकलेले आणि फूल नसलेले झाड नजरेस पडते. त्या आजोबांना काय किंवा अजून कोणी तोडले असल्यास काय ते फूल तोडल्यावर समाधान मिळत असेल-नसेल; पण देवाला तरी असे ओरबाडलेले फूल वाहिले तर आवडणार आहे का कधी...?

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### अजिंक्य पर्वाची सांगता



भारतीय क्रिकेटमधील शांत, संयमी आणि विश्वासार्ह फलंदाज अजिंक्य रहाणे याने आज सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करत आपल्या दोन दशकांच्या शानदार कारकीर्दीला पूर्णविराम दिला. त्याने भारतासाठी ८५ कसोटी सामन्यांत ५०७७ धावा, १२ शतके आणि २६ अर्धशतके झळकावली. २०२०-२१ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर ॲडलेडमधील पराभवानंतर संघाचे नेतृत्व स्वीकारत त्याने भारताला ऐतिहासिक २-१ मालिका विजय मिळवून दिला; जो भारतीय क्रिकेटच्या सुवर्णक्षणांपैकी एक मानला जातो. कसोटी क्रिकेटमधील त्याची संयमी फलंदाजी, परदेशातील संस्मरणीय शतके आणि संकटाच्या वेळी संघासाठी खंबीरपणे उभे राहण्याची वृत्ती यामुळे रहाणे कायमच चाहत्यांच्या स्मरणात राहील. त्याच्या शांत नेतृत्वाला आणि क्रिकेटसाठीच्या योगदानाला मनःपूर्वक सलाम आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**माधव ताटके**/पुणे

■■■

### समाजोपयोगी उपक्रम

३ जुलैच्या तरुण भारतात कॅरीबॅगमुक्त समाजासाठी दुवा केंद्र फाऊंडेशन देत असलेला लढा आणि त्यातून गरजू महिलांना मिळत असलेला रोजगार याबद्दलची बातमी छापून आली होती. ही बातमी मी माझ्या व्हॉट्सॲप स्टेटसला ठेवली होती. ती वाचून एका महिलेने आम्हाला त्यांच्या संस्थेतील एका कार्यक्रमासाठी ५०० कापडी पिशव्यांची ऑर्डर दिली. आमच्याकडे शिवण शिवणाऱ्या गरजू महिलांसाठी ही ऑर्डर खूप मोलाची आहे. ज्या ५०० कॅरीबॅग वाटल्या जाणार होत्या त्याऐवजी आता ५०० कापडी पिशव्या वापरात येतील, हाही तितकाच महत्त्वाचा भाग. अशा समाजोपयोगी उपक्रमांना आपण देत असलेल्या प्रसिद्धीबद्दल मनःपूर्वक धन्यवाद. ■

**अर्चना गोगटे**/९९२२४२३८३३

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ८ ऑगस्टपर्यंत शाळा सकाळ सत्रातच भरणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ ऑगस्ट : विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत शासकीय, स्थानिक प्राधिकारी, कंत्राटी कर्मचाऱ्यांसोबत शिक्षकांनाही मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटीस ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे शाळांची वेळ देखील ८ ऑगस्टपर्यंत सकाळ सत्रात ठेवावी, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी काढले.

विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्या दोषविरहित व अचूक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण सुमारे २४ वर्षांनंतर राबविण्यात येत आहे. हे काम राष्ट्रीय कर्तव्य असून, भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत पार पाडण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून कामकाज करण्यास पुरेसा वेळ मिळावा. तसेच काम वेळेत पूर्ण व्हावे आणि त्यांच्यावर कामाचा ताण येऊ नये. याकरिता सर्व शाळा प्रशासनांना शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळेच्या वेळेसंबंधी कळविण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना केल्या आहेत. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटीस ८ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ दिली आहे. बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षकांच्या अध्यापनाचे नियोजन करताना त्यांच्या शिकवणीच्या तासिका शक्यतो कमीत कमी ठेवाव्यात, असे पत्रात म्हटले आहे.



## विविध वृत्त.....

## ऊर्जा बचतीवर तांत्रिक कार्यशाळा




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ ऑगस्ट : महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), विभागीय कार्यालय, लातूर यांच्या वतीने ब्रिज हॉटेल, लातूर येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नगरपालिका व महानगरपालिकांच्या पंपिंग प्रणालीतील ऊर्जा कार्यक्षमता वाढविणे आणि ऊर्जा बचतीस प्रोत्साहन देण्यासाठी अभियंते, पंप ऑपरेटर व तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी एकदिवसीय तांत्रिक कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन लातूर महानगरपालिकेचे माननीय आयुक्त राहुल कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी महाऊर्जाचे विभागीय महाव्यवस्थापक आनंद कुलकर्णी, प्रकल्प कार्यकारी अधिकारी दत्तात्रय शेंडगे, मराठवाडा विभागातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विविध नगरपालिका व महानगरपालिकांचे अधिकारी, अभियंते तसेच तांत्रिक कर्मचारी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन महाऊर्जा संस्थेचे महासंचालक माननीय ओमप्रकाश बकोरिया व अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यशाळेचा उद्देश नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणीपुरवठा व पंपिंग प्रणालींचे ऊर्जा-कार्यक्षम व्यवस्थापन करून वीज खर्चात बचत करणे हा आहे. कार्यशाळेतील तांत्रिक सत्रांमध्ये महाऊर्जा अधिकृत क्लास-ए ऊर्जा लेखापरीक्षक केदार खमितकर यांनी नगरपालिका ऊर्जा व्यवस्थापन, CONNECTED LOAD चे योग्य नियोजन, पंप कार्यक्षमता, इंडक्शन मोटर लोडिंग, पॉवर क्वालिटी तसेच ऊर्जा लेखापरीक्षणाच्या सर्वोत्तम कार्यपद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच, ऊर्जा लेखापरीक्षक प्रमोद दासपूते यांनी पंपिंग प्रणालीवरील विशेष तांत्रिक सत्रात योग्य क्षमतेच्या पंपांची निवड, कार्यक्षम संचालन, प्रणालीची कार्यक्षमता वाढविण्याच्या पद्धती तसेच नगरपालिका पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी ऊर्जा बचतीचे व्यावहारिक उपाय यांची माहिती दिली. संवादात्मक स्वरूपातील या कार्यशाळेत सहभागी अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पाणीपुरवठा व्यवस्थेतील तांत्रिक आव्हाने, ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्याच्या उपाययोजना आणि परिचालन खर्च कमी करण्यासाठी आवश्यक असलेल्या आधुनिक तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

### सिद्धेश्वर को. ऑप. च्या उपाध्यक्षपदी विजयकुमार मानकरी यांची निवड शिवनेरी मित्र मंडळ ग्रुपकडून सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ ऑगस्ट : देवणी येथील तरूण उद्योजक विजयकुमार मलिकार्जुन मानकरी (सावकार) यांची सिद्धेश्वर को. ऑप. बँक लातूरच्या उपाध्यक्षपदी बहुमताने निवड झाल्याबद्दल शिवनेरी मित्र मंडळ लातूरच्या वतीने सत्कार करताना यावेळी संजय सावरीकर, संजय माने, विश्वास पाटील कामखेडकर, गजानन चव्हाण, शाम पवार, दत्तात्रय चव्हाण, प्रा. गणेश माने व इतर मित्र मंडळी उपस्थित होती.

## ये रे माझ्या मागल्या..पावसामुळे बुजविण्यात आलेले खड्डे झाले पूर्ववत..!

तभा वृत्तसेवा

लातूर : लातूर शहराच्या विविध भागात रस्त्यावर पडलेले खड्डे काही दिवसांपूर्वी मुरूम टाकून बुजविण्यात आले होते. त्या कामाचा दर्जा एवढा निकृष्ट होता की, केवळ खड्डे बुजविले का तर बुजविले , असे सांगण्यासाठी आणि संबंधित कंत्राटदाराचे घर भरण्यासाठी अशा प्रकारचे काम केल्याचे दृष्टीपथास येत होते. अखेर ते खरे ठरले असून दोन दिवसापूर्वी शहरात झालेल्या जोरदार पावसाने हे सगळे खड्डे पुन्हा एकदा पूर्ववत झाल्याचे पाहावयास मिळत आहे. खड्डे बुजविण्यासाठी वापरण्यात आलेला निधी अक्षरशः वाया गेल्याची प्रचिती लातूरकरांना येत आहे.

लातूर शहरातील विकास कामांचा मागच्या काही दिवसात अतिशय निकृष्ट राहिला आहे. लातुरात केवळ नावालाच विकास कामे चालू आहेत की काय ? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडताना दिसतोय. कामाच्या दर्जा संदर्भात सामान्यांनी आवाज उठवायचा प्रयत्न केला तरी त्याकडे कोणी गांभीर्याने पाहत नसल्याने जे काही चाललेय ते सगळे ' मिलिभगत ' असल्याचा संशय निर्माण होत आहे. आजघडीला क्षेत्र कोणतेही असो, तेथे भ्रष्टाचाराचा शिरकाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. मनपा कार्यक्षेत्रात तर भ्रष्ट अधिकाऱ्यांवर दबाव आणून काही मंडळी विकास कामे आपल्याकडे खेचून घेऊन ती इतरांना बहाल करून त्यांच्याकडून कमिशन वसूल करण्यातच धन्यता मानत असल्याची चर्चा सध्या शहर परिसरात सुरु आहे. या प्रवृत्तीमुळेच कदाचित विकास कामांचा दर्जा सातत्याने ढासळताना दिसत आहे. नागरिकांनी कर रूपाने भरलेल्या पैशाची अशा पद्धतीने उधळपट्टी होत असेल तर आम्ही कराचा भरणा करायचा तरी कशासाठी ? अशा संतप्त भावना शहरवासियांतून व्यक्त होताना दिसत आहेत.



मनपाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहरात चालणाऱ्या दर्जाहिन कामांवर नजर ठेवून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्यासाठी पुढे सरसावणे गरजेचे झाले आहे. शहराच्या अनेक भागात मागच्या काही दिवसात रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना वाहन चालविताना अडथळा येत असल्याने ते खड्डे मुरूम टाकून बुजविण्यात आले होते. बुजविण्यात आले असे म्हटल्यापेक्षा खड्ड्यावर फक्त मुरूम टाकण्यात आला होता , असे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल. परिणामतः ते काम जोरदार पाऊस झाल्यानंतर टिकणारच नव्हते. प्रत्यक्षात झालेही तसेच. दोन तीन दिवसापूर्वी शहर परिसरात यावर्षीच्या पावसाळ्यातील पहिला चांगला पाऊस झाला. या पावसाने नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात असले तरी रस्त्यावरील खड्ड्यांचा पुन्हा एकदा सामना करावा लागणार असल्याच्या चिंतेने व्याकुळ करून टाकले आहे.

नुकत्याच झालेल्या पावसाने मनपाचे मान्सूनपूर्व कामे किती उच्च दर्जाने पूर्ण केली गेली आहेत, याचेही पितळ उघडे पडले आहे. शहराच्या अनेक भागातील गटारी अक्षरशः तुंबल्या असून गटारीत वर्षानुवर्षे साचलेली घाण,कचरा विविध भागात रस्त्यावर इतस्ततः पसरल्याचे पाहावयास मिळाले. ही बाब मनपाच्या सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही पाहिली आहे. त्यामुळे त्यांनाही मनपात चालणाऱ्या कामाच्या दर्जाची कल्पना आलीच असणार आहे. त्यामुळे किमान येणाऱ्या काळात तरी अशा प्रकारची दर्जाहिन कामे लातुरात होणार नाहीत,अशी कल्पना आपण बाळगून चालू अशा भावना नागरीकातून व्यक्त केल्या जात आहेत. दरम्यान, खड्डे बुजविण्याचे करण्यात आलेले थातुर मातुर काम संबंधित कंत्राटदारांकडून पूर्वीच्याच बिलातून पुन्हा एकदा करून घ्यावे, अशी अपेक्षा शहरवासीय व्यक्त करत आहेत.

पाहू या, यासंदर्भात मनपा प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेतात ते..

### वैद्यकीय सुविधांबाबत आरोग्य मंत्र्यांचे निर्देश

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ ऑगस्ट : जिल्हा रुग्णालयाच्या प्रस्तावित ४०० खटांच्या विस्तारासाठी खर्चाचा अंदाजपत्रक सादर करावेत आणि औसा उपजिल्हा रुग्णालयात ६९ पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावाला गती देण्याचे निर्देश आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

जिल्ह्यातील आरोग्य सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या उपस्थितीत मंत्री अबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.

यावेळी आ. अभिमन्यू पवार यांनी सरकारला सध्याच्या जिल्हा रुग्णालयाचे ५०० खाटांच्या सुविधेत श्रेणीवर्धन करण्याचे आवाहन केले. मंत्री अबिटकर यांनी अधिकाऱ्यांना जागेची पाहणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

## अण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे कष्टकरी व वंचिताचा आवाज : आ.संजय बनसोडे

तभा वृत्तसेवा

उदगीर, दि. १ ऑगस्ट : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ साहित्य नसून कष्टकरी, श्रमिक, दलित आणि वंचित समाजाच्या वेदना, संघर्ष व स्वाभिमानाला शब्दबद्ध करणारा बुलंद आवाज आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर येथील साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने ध्वजारोहण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी नगराध्यक्षा सौ.स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा सौ.शितल शिंदे, बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, जि.प.चे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, जि.प.सदस्य डॉ.दिपक सोमवंशी, गटनेते दिलीप मटके, तहसिलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी दिपक मोरे, बन्शिलाल कांबळे, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, प्रा.रामकिशन सोनकांबळे, नगरसेवक अनिल मुदाळे, मनोज पुदाले, अमोल अनकल्ले, बाळासाहेब मरलापल्ले, राजकुमार भालेराव, राजकुमार हुडगे, जवाहरलाल कांबळे, धिरज कसबे, अमर सुर्यवंशी, वर्षा कांबळे, शिवकुमार कांबळे, बाळासाहेब पाटोदे, अशोक पुदाले,

गणेश गायकवाड, राजकुमार लिंबाळे, विरेंद्र अंबरखाने, ओम गांजुरे, कल्याण कपाळे, मुकरम जहागिरदार, व्यंकट बोईनवाड, इमरोज हाशमी, इब्राहिम नाना, जफर सय्यद, राजकुमार चव्हाण, नवनाथ गायकवाड, अरविंद गिलचे, संघशक्ती बलांडे, मधुमती कनशेट्टे, उर्मिला वाघमारे, रविंद्र बेंद्रे, बालाजी रणदिवे, प्रेम जवळगेकर, देवीलाल कांबळे, महादेव शेल्हाळकर, राजु सुर्यवंशी, राम मोतीराम, नागेश गुंडीले, अंबादास कांबळे, गौतम किंवडे, आनंद बोडके, ऋषी लांडगे, दुर्गाप्रसाद गोटमुकले, अमोल सुर्यवंशी, राम कांबळे, सलिम शेख, आदी उपस्थित होते.

आ.संजय बनसोडे पुढे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून समाजातील अन्याय, विषमता आणि शोषणाविरोधात प्रभावी आवाज उठवला. त्यांनी लोकशाही, समता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये आपल्या साहित्याद्वारे जनमानसात रुजवली. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि लोककलेतून सामान्य माणसाच्या जीवनसंघर्षाला स्वतंत्र्य मिळाले. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव सरकारने 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देवुन करावा अशी मागणी मी मागील काळात सरकारकडे केली असुन त्यासाठी माझा पाठपुरावा चालु असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

आपल्या पुढच्या पिढीला प्रेरणा मिळावी म्हणून उदगीर शहरात अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने १५ कोटीचे भव्य स्मारक आणि अण्णाभाऊ साठे यांचा १५ फुटी पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी १ कोटी २५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. येत्या एक वर्षात सदर काम पुर्ण होईल असे सांगितले.

समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बन्सिलाल कांबळे यांनी केले. सुत्रसंचालन किरण सुर्यवंशी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रथमेश देवनाळे यांनी आभार व्यक्त केले.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यप्रेमी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फाउंडर डे निमित्त लीनेस क्लबने घेतले विविध उपक्रम महिलासाठी डिजिटल साक्षर कार्यशाळा



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १ ऑगस्ट : लीनेस क्लब अहमदपूर च्या वतीने फाउंडर डे उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महिलांसाठी डिजिटल साक्षरता शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिरामध्ये मोबाईल बँकिंग, ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची सुरक्षा, सायबर फसवणूक टाळण्याचे उपाय याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित महिलांनी या प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

याच कार्यक्रमात क्लबची मासिक सभा देखील पार पडली. सभेमध्ये आगामी सामाजिक उपक्रम, सेवा प्रकल्प आणि क्लबच्या विविध कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन क्लबच्या सदस्या घोटे मॅडम, पूर्वाध्यक्ष रेखाताई तरडे, सचिव शुभांगी पाटील आणि कोषाध्यक्ष छायाताई विळेगाव यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सदस्यांनी सहकार्य केले. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

याच बरोबर अहमदपूर लिनेस क्लब सामाजिक कार्याचा भाग स्वरूपात वर्षभर विविध प्रकारचे उपक्रम राबवतो त्याचाच भाग म्हणून नुकतेच लीनेस क्लब ऑफ अहमदपूरच्या वतीने आश्रमशाळेला एलईडी टीव्ही, साऊंड बॉक्स, टेबल, खुर्च्या, कॉट तसेच अन्य फर्निचर साहित्य भेट देण्यात आले.

या सामाजिक उपक्रमासाठी लीनेस क्लबच्या माजी अध्यक्षा रेखाताई तरडे यांनी प्रायोजक म्हणून मोलाचे सहकार्य केले. यावेळी क्लबच्या सचिव शुभांगी पाटील, सदस्या लीला डबीर तसेच इतर लीनेस सदस्य उपस्थित होते. या उपक्रमामुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व दैनंदिन सुविधांसाठी मोठी मदत होणार आहे.

## अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळकांना 'राजमाता जिजामाता'मध्ये अभिवादन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १ ऑगस्ट : येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यामंदिरात शनिवारीलोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

प्रारंभी संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, संचालक मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, संचालक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्रा. राजकुमार जाधव, सुधाकर लोहकरे, आर. पी. मुंडे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी, लोकमान्य टिळकांची देशभक्ती आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सामाजिक जाणीव व संघर्ष हे गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत, असे आवाहन केले. यावेळी संकुलातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठाण भोपणी ता. देवणी जि. लातूर

### कै. रसिका महाविद्यालय, देवणी

ता.देवणी जि.लातूर

(पाहिजेत)

मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड यांचे ना-हरकत प्रमाणपत्र क्र. ससंउशिनां/घ.ता./अनु-२/२०२६-२७/ दिनांक १५/०६/२०२६ आणि अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र कै. रसिका महाविद्यालय,देवणी जि.लातूर (अनुदानित) पदवी विज्ञान शाखेसाठी खालीलप्रमाणे रिक्त असलेली **घड्याळी तासीका तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात खालील सहा.प्राध्यापक** पदे शैक्षणिक वर्ष **२०२६-२०२७** साठी भरणे आहेत.

तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने मुळ कागदपत्रे व एका लिखित परीपूर्ण अर्जासह (सोबत शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडून) दिनांक ०३-०८-२०२६ वार **सोमवार** रोजी सकाळी ठीक **११-००** वाजता महाविद्यालयात मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. 17-08-2026

| अ.क्र | विषय | पदसंख्या | पदाचे स्वरुप | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | भौतिकशास्त्र | ०४ | घडयाळी तासिका तत्वावर | अनुदानित |
| २ | रसायनशास्त्र | ०५ | घडयाळी तासिका तत्वावर | अनुदानित |
| ३ | वनस्पतीशास्त्र | ०१ | घडयाळी तासिका तत्वावर | अनुदानित |
| एकुण | | १० | | |

टिप- 1- शैक्षणिक अर्हता- एम.एससी./एम.कॉम. 55 टक्के सेट/नेट/पी.एचडी.
2- वेतन व भत्ते शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या नियमानुसार राहिल.
3- तासिका तत्वावरील नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी व हक्काची मागणी करणार नाही. असे 100 रू. स्टँप पेपरवर रुजु होते वेळेस हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4- मुलाखतीला येणा-यास प्रवास भत्ता व प्रवास खर्च दिला जाणार नाही.

स्वाक्षरीत/-

सचिव
(मा. श्री. गजानन गोविंदराव बिरादार)
जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठाण भोपणी ता.देवणी

प्राचार्य
(प्रा.डॉ.चंद्रकांत अं. जावळे)
कै. रसिका महाविद्यालय, देवणी ता. देवणी जि. लातूर

# जन्मदात्या आईच्या खूनप्रकरणी आरोपीस जन्मठेप व दंड

## प्रभावी तपास, भक्कम पुरावे आणि सरकारी पक्षाच्या युक्तिवादामुळे आरोपी दोषी

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. १ ऑगस्ट -**

कंधार येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश (द्वितीय)कुलकर्णी यांनी माळाकोळी पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा रजिस्टर क्रमांक १६१/२०२३ (भा.दं.वि. कलम ३०२) मधील सत्र प्रकरण क्रमांक ०६/२०२४ मध्ये आरोपी नृसिंह बालाजी केंद्रे यास दोषी ठरवून जन्मठेप व दंडाची शिक्षा सुनावली.

दि. २४ ऑक्टोबर २०२३ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास बेलवाडी शिवार (ता. कंधार) येथे कौटुंबिक वादातून आरोपीने आपल्या जन्मदात्या आईवर लोखंडी कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर फिर्यादी बालाजी एकनाथराव केंद्रे यांच्या तक्रारीवरून माळाकोळी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.



तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय अहवाल, शस्त्र जप्ती, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब, वैज्ञानिक व परिस्थितीजन्य पुरावे संकलित करण्यात आले. तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय धोंडीराम निलपत्रेवार यांनी काटेकोर व निष्पक्ष तपास पूर्ण करून विहित मुदतीत दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

सुनावणीदरम्यान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. नितीन कागणे यांनी साक्षीदारांचे प्रभावी परीक्षण करून वैद्यकीय, वैज्ञानिक व परिस्थितीजन्य पुरावे न्यायालयासमोर भक्कमपणे मांडले. सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस जन्मठेप व दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्यात पोलीस उपनिरीक्षक नईम खान व पोलीस हवालदार पारडे यांनी तपास अधिकारी व सरकारी पक्षास मोलाचे सहकार्य केले.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयीन खटल्यांचा प्रभावी पाठपुरावा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या Trial Monitoring Cell च्या सातत्यपूर्ण समन्वयामुळे गंभीर स्वरूपाच्या या खूनप्रकरणात आरोपीस शिक्षा होण्यास महत्त्वाची मदत झाली.

या निकालानंतर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी उत्कृष्ट तपास करून आरोपीस शिक्षा होण्यासाठी प्रभावी भूमिका बजावणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय धोंडीराम निलपत्रेवार, सहायक सरकारी अभियोक्ता श्री. नितीन कागणे तसेच तपासात सहभागी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

हा निकाल गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्यांवर कायद्याचा धाक कायम असल्याचा ठोस संदेश देणारा असून, गुणवत्तापूर्ण तपास, वेळेत दाखल करण्यात आलेले दोषारोपपत्र आणि न्यायालयीन खटल्याच्या प्रभावी पाठपुराव्याचे हे यशस्वी उदाहरण आहे.

## बारड येथे श्री साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा अभूतपूर्व सोहळा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यातील बारड नगरीत ग्रामस्थांनी तसेच श्रीकृष्ण साई मंदिर विश्वस्त समितीने श्रद्धा , सेवा , एकोपा सामाजिक ऐक्याची परंपरा जोपासत गुरु पौर्णिमेच्या पावन पर्वावर श्री साईबाबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा दि.२९ जुलै रोजी वेदमंत्रांच्या मंगल घोषात हजारो भक्तांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात सोहळा पार पडला आहे .ओम साईरामच्या अखंड जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला असून भाविकांनी पंचपकवान युक्त ५६ भोग महाप्रसादाचा ला बघितला आहे.



श्री शितलादेवीच्या पावन भूमीत उभारण्यात आलेले हे मंदिर शिर्डीच्या साई मंदिराची हुबेहूब प्रतिकृती ठरली आहे. ग्रामस्थांच्या वतीने लोकसहभाग, श्रमदान, लोकवर्गणीतून ७५०० स्क्वेअर फ ुट इतक्या जागेत भव्य मंदिराची उभारणी केली आहे. मंदिरातील गाभारा ३० बाय ३० फूट इतका मोठा असून श्री साईबाबांची पाच फूट उंच उंचीची सुरेख देखणी मूर्ती भाविकांना आकर्षित करणारी ठरली आहे. यानिमित्त मंदिराची फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली असून विद्युत रोषणाई मनोहरी देखाव्याने परिसर उजळून गेला होता. श्री साईबाबा मंदिरात दि.२९ जुलै रोजी सकाळी ९:२१ मिनिटांनी गुरुवर्य शास्त्री अपरंपार स्वामी,गंगाधर स्वामी, गजानन स्वामी, प्रवीण स्वामी यांच्या वेदमंत्रोपचाराने विधिवत मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

श्रीकृष्ण ओम साई विश्वस्त समितीच्या वतीने हजारो साई भक्तांच्या उपस्थितीत ओम साई राम चा अखंड जप करत सामूहिक महापूजा, होम हवन, महाआरती करण्यात आली. यानिमित्त हरिभक्त परायण प्रेम मुक्ती हर्षल महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाचा साई भक्तांनी लाभ घेतला. यानंतर साई भक्तांनि पंचपकवान युक्त मिष्टांन भोजन महाप्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्यास भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे संचालक कैलास दाड, व्यंकटराव कल्याणकर, शामराव पाटील टेकाळे, सरपंच मंगला बुरडे, भाजप जिल्हाध्यक्ष एडवोकेट किशोर देशमुख, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, भाजप जिल्हा महामंत्री बाळासाहेब देशमुख, संजय देशमुख,भाजप महिला तालुकाध्यक्ष कोमल जयस्वाल, सेवानिवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी के डी देशमुख, भाजपा जिल्हा सल्लागार उत्तमराव लोमटे, माजी सरपंच दिलीपराव कोरे ,बिहारी दरक,महेश देशम ुख, सुरेश देशमुख, गणपत पिठलेवाड, दिगंबर टिप्परसे, बालाजी लोणवडे, गजानन कत्रे, शरद कवळे , अमोल दरक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व साई भक्तांनी आवर्जून उपस्थिती लावली होती. प्राणप्रतिष्ठा सोहळा यशस्वी ते साठी श्रीकृष्ण साई मंदिर विश्वस्त समितीचे अध्यक्ष संजय देशमुख, म ाधव लोमटे, बळीराम लोणवडे, संतोष आम्रे,शिवानंद आमदुरकर, शिवराज एम ले, नामदेव सूर्यालाड, केदार देशमुख, नरेश मनोरवार,विजय देशमुख,गजानन बंडेवार, रुपेश मुंडीक, सुशील मुलंगे, मारुती लोणवडे, सचिन बने , संतोष एमले , गणेश पवार, नारायण चव्हाण, बाबुराव पांचाळ , शंतनु सितावर, प्रभाकर पत्तीवार, रामेश्वर कराळे, स्वप्निल कोरे, रवी लोंढे, विशाल कदम, बाहुबली म हाजन, लोकेश देशमुख, योगेश धुडकेवार, योगेश सूर्यवंशी, साई टीपरसे यांच्यासह ग्रामस्थ , युवा मित्र मंडळ साई भक्तांनी परिश्रम घेतले.



## लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**नायगांव-** तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक ,पोस्ट बेसिक कनिष्ठ महाविद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. प्राचार्य पांडुरंग येवले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात संस्थापक अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड यांच्या हस्ते लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर उच्च माध्यमिक विभागाचे गणेश म ारताळेकर यांच्यासह सर्व प्राध्यापक शिक्षक व कर्मचाऱ्यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माध्यमिकचे शिक्षक आनंदराव सूर्यवंशी यांनी परिस्थिती माणसाला घडवत नसून माणूसच परिस्थिती घडवतो हा अण्णाभाऊ साठे यांचा विचार विद्यार्थ्यांसमोर मांडला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केवळ दीड दिवस शालेय शिक्षण घेऊनही अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून शोषित वंचित पीडित आणि श्रमिक समाजाचे वास्तव जगा समोर मांडले. त्यांच्या फकिरा कादंबरीने मराठी साहित्यात अजरामर स्थान मिळवले असून त्यांच्या शाहिरीतील पोवाडे आणि लोकनाट्य आजही जनमानसाला प्रेरणा देतात असे त्यांनी सांगितले. कष्ट चिकाटी स्वाभिमान शिक्षणाची ओढ समाजसेवा अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती आणि समानतेचा विचार हीच अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातून घेण्यासारखी खरी प्रेरणा असून त्यांच्या विचारांनुसार ज्ञानाच्या बळावर उज्ज्वल भविष्य घडवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड, साहेबराव येवरे ,एकनाथ मुनगिलवार, सतीश हाणमंते ,फेरोज शेख ,प्रा. हेमंत बावणे ,आकाश सूर्यवंशी बालाजी माळगे ,माधवराव वाघमारे ,अवचित शेजूळ, शिव शंकर कोरे ,दिलीप माने ,धोंडिबा तेलंग, नागनाथ येल्लूरे सूर्यकांत जाधव ,सुभाष कदम ,जिल्हानी शेख , व्यंकट रेकूळवाड, सुभाष राठोड ,गुणवंत कंदूर्के ,मुजमिल शेख यांच्यासह प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हेमंत बावणे यांनी केले.

## सेवेतून जपला विचारांचा वारसा; स्व. अजितदादा पवार जयंतीनिमित्त देगलूरात सामाजिक उपक्रमांची पर्वणी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १ ऑगस्ट -**

स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासन व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पार्टीच्या वतीने दि. २२ ते २८ जुलै दरम्यान सात दिवसीय 'सेवा सप्ताहा'चे आयोजन करण्यात आले होते. याचाच भाग म्हणून देगलूर येथे राष्ट्रवादीचे नेते लक्ष्मीकांत पदमवार सावकार, नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजी टेकाळे व शहराध्यक्ष देवेंद्र मोतेवार यांच्या नेतृत्वाखाली सेवा सप्ताह' निमित्त आरोग्य शिबीर, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, शहरातील गुणवंत खेळाडूंचा गौरव आणि पत्रकार बांधवांचा सन्मानासह विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. स्व. अजितदादा पवार यांच्या विचारांचा वारसा सेवेतून जोपासण्यात आले.

सेवा सप्ताहाची सुरुवात पहिल्या दिवशी स्व. पवारांच्या जयंतीदिनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर 'सुवर्ण कमल दल'च्या माध्यमातून नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी 'स्वच्छ शहर सुंदर शहर' या संकल्पनेतून शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत स्वच्छतेचा संदेश दिला.

स्व. दादांच्या जयंतीनिमित्त तिसऱ्या दिवशी राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंसह त्यांना घडविणाऱ्या प्रशिक्षक व शिक्षकांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

तर चौथ्या दिवशी शहरातील यशवंतराव चव्हाण गृहनिर्माण सोसायटी येथे वृक्षारोपण करण्यात आले विशेष म्हणजे या लावण्यात आलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी लोखंडी जाळीचे कुंपण बसविण्यात आले. 'एक व्यक्ती एक वृक्ष' या दत्तक मोहिमेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आले. यासंदर्भात लक्ष्मीकांत पदमवार यांनी म्हणाले की, स्व. अजितदादा पवार यांच्या विचारांतूनच देगलूर शहरात दहा हजार वृक्ष लागवड करणार आहोत, असे ते म्हणाले. पाचव्या दिवशी नरंगल रोड येथे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली.

तसेच शेवटच्या दिवशी रक्तदान व पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. रक्तदान शिबिराला युवक व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक रक्तदात्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. तर लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून काम करणाऱ्या देगलूर परिसरातील पत्रकारांचा सन्मान 'लेखणी व सन्मानपत्र' देऊन गौरविण्यात आले. एकूणच स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात आलेला सेवा सप्ताह सत्कारणी लागला, असे नागरिकांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

## सिडको आरोग्य केंद्र येथे आरोग्य जनकल्याण समितीची बैठक

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १ ऑगस्ट -**

मुख्यमंत्री आरोग्य जनकल्याण समितीची बैठक दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी मातृसेवा आरोग्य केंद्र सिडको येथे समितीतील सदस्य तथा प्रभाग क्रमांक २० मधील सर्व नगरसेवक यांच्या उपस्थितीत सिडकोतील आरोग्य केंद्रातील विविध समस्यावर चर्चा करण्यात आली.

सिडको येथील मातृसेवा आरोग्य केंद्र येथे आरोग्य जनकल्याण समिती अर्थात (महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य वैद्यकीय मदत) ही समिती स्थानिक आरोग्य केंद्राच्या विकासासाठी काम करत असुन या समितीची बैठक दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी नगरसेवक / सेविका तथा आरोग्य जनकल्याण समितीचे सदस्य विद्यमान नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशम ुख, सुवर्णा बसवते, मंगलाताई देशमुख, निरंजना लांडगे ,उदय देशमुख यांनी बैठकीस उपस्थित राहून आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे व आरोग्य कर्मचारी आशा वर्कर यांच्याशी विविध मुद्द्यावर चर्चा करून सिडको येथील आरोग्य केंद्रास महिला डॉक्टर, बालरोग तज्ञ डॉक्टर ,परिचारिका (छच्) व सेवक यांची पूर्तता करण्याची मागणी करण्यात



आली. तसेच या ठिकाणी अंतर रुग्ण विभाग व त्यासाठी लागणारे कर्मचारी वर्ग व औषधी पुरवठा वेळेवर उपलब्ध करून देणे वरील सर्व सुविधांची मागणी आरोग्य अधिकारी डॉक्टर संतोष शिंदे व आरोग्य कर्मचारी ,आशा वर्कर यांनी केली तेव्हा आरोग्य समितीचे सदस्य तथा नगरसेवक संजय पाटील घोगरे, सुवर्ण बसवते, मंगलाताई देशमुख व उदय देशमुख यांनी सदरील प्रश्न आम्ही मनपाच्या जनरल बैठकीत ठेवून म ान्यता घेऊन हा प्रश्न लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी या बैठकीस आरोग्य केंद्राचे आरोग्य कर्मचारी गलपवाड, ओमप्रकाश सूर्यवंशी, सुखदेव जोंधळे, परिचारिका प्रियंका रच्चेवार, मीनाक्षी शिंदे, जयश्री दरेगावे, माधवी पेंढारकर व आशा वर्कर व समितीचे सदस्य पत्रकार संभाजी सोनकांबळे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांनी केले तर आभार मीनाक्षी शिंदे यांनी मानले.

## सहस्त्रकुंड येथे ४४ वर्षांनंतर भगवान परशुराम मूर्तीची पुन:प्रतिष्ठापना

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १ ऑगस्ट -**

जिल्ह्यातील हिमायतनगर पासून जवळच असलेले सहस्त्रकुंड हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून म हाराष्ट्र सह पर राज्यातून पर्यटक येथे धबधबा पाहण्यासाठी येत असतात .तसेच येथील प्राचीन महादेवाचे मंदिर ३०० ते ४०० वर्षे जुने असल्याचे सांगितले जाते. मंदिराजवळच पैनगंगा नदीवर सहस्त्रकुंड धबधबा आहे. येथील सहस्त्रकुंड धबधबा भगवान परशुरामाने जमिनीत बाण मारून निर्माण केला अशी आख्यायिका प्रचलित आहे. यावरून हे देवस्थान हजारो वर्ष प्राचीन असल्याचा अंदाज येथील जुने जाणकार व्यक्त करतात. येथे सुमारे ३० ते ४० फूट उंच कातळ कड्यावरून जलधारा कोसळत असते. त्या शंकराच्या जटातून पडणाऱ्या गंगेसारख्या भासत आहे. पावसाळ्यात या धबधब्याचे सौंदर्य काही औरच असते येथील महादेव मंदिरात महाशिवरात्र महोत्सवानिमित्त भव्य यात्रेचे आयोजन करण्यात येते. हे कुंड परशुराम निर्मित असल्यामुळे इथे भगवान परशुरामाचे वास्तव्य असल्याचे बोलले जात असून धबधब्याच्या मधोमध अगदी जवळ परशुराम चबुतरा आहे. या परशुरामच्या ओट्यावर पूर्वीपासूनच पितळेची भगवान परशुरामाची म ूर्ती होती. पण सन १९८२ मध्ये आलेल्या महापुरात सहस्त्रकुंड परिसरातील भगवान परशुरामाचे मंदिर आणि इतर देवतांच्या मूर्ती वाहून गेल्या होत्या. त्यानंतर अनेक वर्षे या पवित्र स्थळाच्या पुनर्विकासाची अपेक्षा होती. अखेर स्थानिक ट्रस्ट, सहस्त्रकुंड मंदिर समितीचे सचिव सतीश वाळकीकर प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर सामाजिक कार्यकर्ते आणि ब्राह्मण महासंघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे भगवान परशुराम यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून या ऐतिहासिक स्थळाला नवसंजीवनी मिळाली आहे.

भगवान परशुराम यांच्या म ूर्तीची प्रतिष्ठापना अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे करण्यात आली असून त्यासाठी महावीरचंद श्रीश्रीमाळ ,अनिल भोरे, उदय देशपांडे, दिलीप पार्डीकर, यांच्यासह हिमायतनगर शहरातील ब्रह्मवृंदांच्या आर्थिक मदतीतून मूर्ती तयार करण्यात आली असून या सर्वांनी या कार्यासाठी सहकार्य केले.

प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी मराठवाड्यासह राज्यभरातील भाविकांना सहस्त्रकुंड येथे भगवान परशुरामांचे दर्शन घेण्याबरोबरच येथील अद्वितीय निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्याचे आवाहन केले. तर ट्रस्टचे सचिव सतीश वाळकीकर यांनी या तीर्थक्षेत्राचा विकास आदर्श धार्मिक-पर्यटन केंद्र म्हणून करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. सहस्त्रकुंडचा विकास पूर्ण झाल्यानंतर हे स्थळ धार्मिक श्रद्धा आणि निसर्ग पर्यटनाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

### टी.सी.हरवली आहे.

प्रतिभा शंकर गवलवाड या नावाची इयत्ता बारावी पासची टी. सी. नांदेड-देगलूर बस प्रवासादरम्यान हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर किंवा मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.

**पत्ता:**
**प्रतिभा शंकर गवलवाड**
**मुक्कम सुंडगी पोस्ट शहापूर ता.देगलूर जि.नांदेड.**
**मोबाईल नंबर- ७०५८०९७६६७**

### जाहिर प्रगटन

तालूका कार्यकारी दंडाधिकारी भोकर यांचे न्यायालयात

जन्म नोंदणी सूधारणा कायदा-२०२३ मध्ये कलम ११(३)अन्वये अर्ज क्रं.अर्जदार रमेश धर्मपूरी आवधूतवाड रा.भूरभूशी ता.भोकर जि.नांदेड विरुध्द जन्म-मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रा.पं.अधिकारी भूरभूशी ता.भोकर

विषय:जन्म मृत्यू नोंदणी सूधारणा कायदा २०२३ च्या कलम ११(२)व (३) अन्वये अर्जदार रमेश धर्मपूरी आवधूतवाड रा.भूरभूशी यांची आई राजगंगाबाई धर्मपूरी आवधूतवाड यांच्या मृत्यूची नोंद घेण्याकरिता आदेशीत करणे बाबत ज्याअर्थी अर्जदार रमेश धर्मपूरी आवधूतवाड रा.भूरभूशी यांची आई राजगंगाबाई धर्मपूरी आवधूतवाड याचा मृत्यू दि.०२/१०/१९९० रोजी त्यांचे राहते घरी भूरभूशी ता.भोकर येथे झाला असून सदर जन्माची नोंद जन्म-मृत्यू नोंदणी सूधारणा कायदा २०२३ च्या कलम च्या कलम ११(२)व (३)अन्वये घेण्याकरीता जन्म-मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी भूरभूशी ता.भोकर यांचे मार्फत प्रस्ताव सादर केला आहे.ज्याअर्थी राजगंगाबाई धर्मपूरी आवधूतवाड यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत अधिकारी कार्यालय भूरभूशी येथे उपलब्ध नाही.त्याअर्थी या जाहीर प्रगटनद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते की राजगंगाबाई धर्मपूरी आवधूतवाड यांच्या मृत्यूची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसामध्ये या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा.विहित मूदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**तहसीलदार तथा**
**तालूका दंडाधिकारी, भोकर**

### जाहिर प्रगटन

नोंदीचा प्रकार:खरेदी

माहिती मिळाल्याचा दि.२८/०७/२६फेरफाराचा दि.२९/०७/२६लिहून देणार:अविश विवेक गंदेवार अशोक दत्तात्रय गंदेवार दिपक दत्तात्रय गंदेवार रा.भोकर(खाता क्र.३२४८)यांचे गट/सर्व्हे क्र.६०६ लागवडीयोग्य क्षेत्र २.७३२६ हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.०११६हे.आर.चौ.मी.पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी सदरील गट क्र.६०६ मधील क्षेत्र ०.११६ दत्तात्रय मारोती गंदेवार रा.भोकर यांनी हयात असताना दूय्यम निबंधक भोकर दस्त क्र.५२४ दि.०७/०४/१९८० रोजी शेख मौलाना काशीम साब यांना विक्रि केला असून आज रोजी कै.दत्तात्रय मारोती गंदेवार यांचे वारसाच्या नावे सामाईक क्षेत्र आहे करिता म.ज.म.अ१९६६चे कलम १४९ व १५० अन्वये ने नोंद घेण्यात आली मंजूरीस्तव सादर लिहून घेणार:शेख मौलाना काशीम साब (खाता क्र.१२३५१)गट/सर्व्हे क्र.६०६ लागवडीयोग्य क्षेत्र ०.०११६हे. आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.५२४दि.०७/०४/१९८० प्रमाणे रक्कम रुपये ३०००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणार्याचे नाव गाव नमूना नं.७/१२ वर दाखल केले. ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फ ेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.


**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**

# मन्याड खोऱ्याच्या जनविश्वासाचा बुलंद आवाज : लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर

सत्तेची पदे अनेकांना मिळतात, पण जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण करण्याचे भाग्य मोजक्यांनाच लाभते. कारण लोकनेता हा निवडणुकीच्या म तपेटीतून घडत नाही; तो घडतो जनतेच्या अश्रूंना आधार देताना, संघर्षात खंबीरपणे उभा राहताना आणि विकासाची स्वप्ने प्रत्यक्षात उतरविताना. लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे अशाच लोकविश्वासातून घडलेले नेतृत्व आहे.

२ ऑगस्ट हा त्यांचा वाढदिवस. हा केवळ एका लोकप्रतिनिधीचा जन्म दिन नाही, तर जनतेसाठी झिजणाऱ्या, समाजहितासाठी झटणाऱ्या आणि विकासाला आयुष्याचे ध्येय मानणाऱ्या एका कर्मयोग्याचा गौरव करण्याचा दिवस आहे.

गेली चार दशके चिखलीकर कुटुंबाने जनतेशी जपलेले नाते हे राजकारणाच्या पलीकडचे आहे. सत्ता आली म्हणून जनता जवळ नाही आणि सत्ता गेली म्हणून जनता दूर नाही-असे हे विश्वासाचे नाते काळाच्या प्रत्येक कसोटीवर टिकले आहे. या परंपरेचा सक्षम वारसा पुढे नेताना प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोकप्रतिनिधित्वाला केवळ राजकीय जबाबदारी न मानता सामाजिक बांधिलकीचे स्वरूप दिले.



आज लोहा-कंधार मतदारसंघाचा उल्लेख विकासाच्या दृष्टीने होत असेल, तर त्यामागे त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची मोठी ताकद आहे. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे, पूल, पिण्याच्या पाण्याच्या योजना, सिंचन, शिक्षण, आरोग्य सुविधा, धार्मिक स्थळांचा विकास आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा ध्यास मतदारसंघाच्या प्रगतीचा महत्त्वाचा आधार ठरला आहे. अनेक वर्षे रखडलेल्या प्रश्नांना त्यांनी शासनाच्या दालनात सातत्याने आवाज दिला आणि त्यांना मार्गी लावण्यासाठी अथक प्रयत्न केले.

मात्र विकासकामांपेक्षाही जनतेला अधिक भावते ती त्यांची माणुसकी. एखाद्या गरीबाच्या घरात संकट कोसळले, शेतकऱ्याला न्यायासाठी संघर्ष करावा लागला, विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदतीची गरज भासली किंवा एखादा रुग्ण उपचारासाठी धडपडत असला, तर मदतीचा हात पुढे करणाऱ्या मोजक्या लोकप्रतिनिधींमध्ये प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यामुळेच त्यांचे कार्यालय हे अनेकांसाठी आशेचे दार बनले आहे.

जनतेने त्यांना दिलेली मन्याड खोऱ्याचा वाघ ही उपाधी केवळ राजकीय ताकदीची नाही; ती अन्यायाविरुद्ध उभे राहण्याच्या त्यांच्या निर्भीड स्वभावाची साक्ष आहे. मतदारसंघाच्या प्रश्नांवर शासनाला जाब विचारताना त्यांचा आवाज ठाम असतो, तर जनतेच्या व्यथा ऐकताना त्यांचे मन तितकेच संवेदनशील असते. संघर्षाची धार आणि माणुसकीची ऊब यांचा दुर्मीळ संगम त्यांच्या नेतृत्वात दिसून येतो.

आजच्या राजकारणात जनतेपासून दूर जाणाऱ्या नेतृत्वाची चर्चा होत असताना प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी मात्र जनतेशी असलेली नाळ अधिक घट्ट केली आहे. त्यांच्या दालनात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपुलकीची वागणूक मिळते. राजकीय पक्ष, जात, धर्म किंवा आर्थिक स्थिती न पाहता मदतीसाठी धावून जाण्याची त्यांची वृत्तीच त्यांच्या लोकप्रियतेचा खरा पाया आहे.

लोकशाहीत निवडणुका जिंकणे हे यशाचे मोजमाप असू शकते; पण जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणे हीच खरी नेतृत्वाची ओळख असते. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी विकास, विश्वास आणि जनसेवेच्या त्रिसूत्रीवर उभे राहून ही ओळख निर्माण केली आहे. म्हणूनच लोहा-कंधारच्या जनतेसाठी ते केवळ आमदार नाहीत, तर संकटात धावून येणारा आधार, विकासाची खात्री आणि लोकविश्वासाचे प्रतीक आहेत.

२ ऑगस्ट रोजी वाढदिवसानिमित्त जनतेच्या हृदयात अढळ स्थान निर्माण करणारे, विकासाला वेग आणि जनसेवेला दिशा देणारे लोकनेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या कार्याचा हा प्रवास अधिक व्यापक व्हावा, समाजहिताची त्यांची धडपड अधिक जोमाने सुरू राहावी आणि जनतेचा हा विश्वास अधिक दृढ व्हावा, हीच असंख्य नागरिकांची सदिच्छा.

**- मारुती जाधव**
**- स्वीय सहाय्यक ,**
**आ. प्रतापराव पाटील चिखलीकर**

# हिंगोली

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# कळमनुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीर उत्साहात

## ७ हजार ५१३ विविध योजनांच्या लाभांचे लाभार्थ्यांना वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कळमनुरी येथील केसरीनंदन मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, अंदाजे ४ हजार ५०० लाभार्थी उपस्थित होते.

या शिबिरास आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव, माजी आमदार गजानन घुगे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते, तहसीलदार जीवककुमार कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजना, सेवा व सुविधांची माहिती देण्याबरोबरच पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण करण्यात आले. यावेळी जिवंत सातबारा उतारे १ हजार १५१, वाटणीपत्रावरील नोंदणी फीमध्ये सवलत/लाभ १३१, पाणंद रस्ते १९, अतिक्रमण नियमानुकूल अर्ज ३८६, घरकुल लाभार्थी ७३, राज्यस्तरीय योजनांचे लाभ ५ हजार ६०८, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शासकीय योजनांचे लाभ २० आणि बसच्या मोफत पासचे वाटप १२५ असे एकूण ७ हजार ५१३ लाभांचे वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहोचविणे, नागरिकांच्या विविध प्रशासकीय अडचणींचे निराकरण करणे आणि महसूल विभागाच्या सेवा सुलभ व गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देणे, हा या समाधान शिबिराचा प्रमुख उद्देश होता. विविध विभागांच्या स्टॉलला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन योजनांची माहिती घेतली. यावेळी आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव तसेच माजी आमदार गजानन घुगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिबिरास विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसमत नगर परिषदेत लोकप्रतिनिधी व बीएलओची महत्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १ ऑगस्ट**



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या ९२-वसमत विधानसभा मतदारसंघाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर गुरुवार (दि. २ जुलै २०२६) रोजी वसमत नगरपरिषद कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. ही बैठक उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत नगरपरिषदेच्या सर्व सदस्यांना एसआयआर मोहिमेचे उद्दिष्ट, कार्यपद्धती आणि नागरिकांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. प्रत्येक नगरसेवकाने आपल्या प्रभागातील प्रत्येक पात्र मतदारापर्यंत ही माहिती पोहोचवून बीएलओ मार्फत देण्यात आलेले ईएफ फॉर्म भरून वेळेत जमा करण्यासाठी जनजागृती करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

यावेळी नगरसेवकांनी उपस्थित केलेल्या विविध शंकांचे निरसन करत मतदार नोंदणी, नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती व आवश्यक कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व बीएलओ व पर्यवेक्षकांनाही विशेष प्रशिक्षण देण्यात आले. एसआयआर प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यासाठी हे काम सर्वोच्च प्राधान्याने करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीनंतर भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राबविण्यात येत असलेल्या हर घर संविधान अभियानांतर्गत समाज कल्याण विभाग, हिंगोली यांच्याकडून प्राप्त झालेल्या संविधान उद्देशिकेच्या प्रती उपविभागीय अधिकारी व नगरपरिषद अध्यक्षा सौ. सुनिता मनमोहन बाहेती यांच्या हस्ते नगरपरिषदेच्या सदस्यांना वितरित करण्यात आल्या.

या बैठकीस नगरपरिषदेच्या अध्यक्षा सौ. सुनिता मनमोहन बाहेती, मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर, सय्यद इम्रान अली नासेर अली, राजेश पवार, काशीनाथ भोसले, डॉ. रेणुकाताई पंतगे, सचिन दगडु, संकेत नामपल्ली, राजकुमार एंगडे, प्रभाकर श्रीरसागर, नय्युम पाशा, स्नेहा मनोहरे, ज्योती वाहुळे, शेख हारुण शेख जाहिराबी जिलानी यांचे प्रतिनिधी जावेद खुरेशी तसेच नगरपरिषदेचे शहर अभियंता नागनाथ देशमुख, अरविंद शिकारी, दाजीबा भोसले, ज्ञानेश्वर जाधव, बालाजी सोनवणे यांच्यासह बीएलओ, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून, प्रत्येक पात्र मतदाराने ईएफ फॉर्म भरून वेळेत बीएलओकडे जमा करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त जिल्हा ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**



जागतिक किर्तीचे प्रतिभावंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या मराठी साहित्य क्षेत्रातील अमूल्य व भरीव योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांच्या जन्मदिवसानिमित्त १ ऑगस्ट हा 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यकृतींसह मराठीतील विविध ग्रंथांचे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक पंडित अवचार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या मराठी साहित्य क्षेत्रातील अमूल्य योगदानावर मार्गदर्शन केले. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यकृतींमधून समाजातील वास्तवाचे प्रभावी चित्रण झाले असून, त्यांच्या लेखनातून युवकांनी प्रेरणा घेऊन लेखनाकडे वळावे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापुरकर, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ तथा जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, गजानन शिंदे, संतोष ससे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक, शंभोनाथ दुभळकर, डिगंबर झुंजारे तसेच ग्रंथालय पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या ग्रंथ प्रदर्शनामध्ये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यकृतींसह मराठी भाषेतील विविध विषयांवरील दर्जेदार ग्रंथ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. हे प्रदर्शन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नेहरू नगर, रिसाला नाका, हिंगोली येथे सर्वांसाठी खुले आहे. नागरिक, विद्यार्थी, युवक, साहित्यप्रेमी तसेच वाचकांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट देऊन त्याचा लाभ घ्यावा आणि अधिकाधिक नागरिकांनी जिल्हा ग्रंथालयाचे सभासद होऊन वाचन संस्कृतीला चालना द्यावी, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक यांनी केले आहे.



**हिंगोली- गावठी पिस्टल व जीवंत काडतुस बाळगून लोकांमध्ये दहशतीचे व भितीचे वातावरण निर्माण करणाऱ्या आरोपीला शहर पोलिसांनी जेरबंद केले. यावेळी ठाण्याचे पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, उपनि गजानन साखरे, जमादार सुनील अंभोरे, दिलीप लेकुळे, संतोष कऱ्हे, आकाश बोथीकर, भूषण जोगे, बाबासाहेब कांबळे आदी. छाया- लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### पोलिस अधीक्षकांकडून अण्णाभाऊ साठेना अभिवादन



हिंगोली- येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात दि १ ऑगस्ट रोजी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण देशमुख यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### जिल्ह्यातील २७ मंडळात अतिवृष्टीची नोंद

हिंगोली- जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी १०३.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, हिंगोली तालुक्यात सर्वात जास्त १४५ मि.मी. पाऊस झाला आहे. तर वसमत तालुक्यात सर्वात कमी ७०.४ मि.मी. पाऊस पडला आहे. जिल्ह्यात आज सकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी १ जूनपासून आजपर्यंत झालेल्या पावसाची आहे. हिंगोली १४५ (५०८.२), कळमनुरी १०४.३ (४५१.२), वसमत ७०.४ (३३८.४), औंढा नागनाथ ११०.८ (४०१.७) आणि सेनगाव तालुक्यात ८९.८ (३३५.६) मि. मी. पाऊस पडला आहे. सर्व आकडेवारी मिलीमीटर परिमाणात आहे. हिंगोली जिल्ह्यात दिनांक १ जून २०२६ ते ३१ जुलै, २०२६ पर्यंत सरासरी ४०८.३ मिलीमीटर पाऊस पडला आहे. त्याची टक्केवारी ५१.३ अशी आहे. हिंगोली जिल्ह्यातील २७ मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. हिंगोली तालुक्यातील सर्व ७ मंडळे, कळमनुरी तालुक्यातील सर्व ६ मंडळे, वसमत तालुक्यातील ४ मंडळे, औंढा नागनाथ तालुक्यातील सर्व ४ मंडळे आणि सेनगाव तालुक्यातील सर्व ६ मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील विविध भागांत झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, तसेच नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

### मटका, जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

हिंगोली- शहरालगत असलेल्या अकोला बायपास बळसोंड भागात चोरून लपवून मटका जुगार अड्ड्यावर छापा मारला. यावेळी आरोपी गंगाधर रूखमाजी खंदारे आणि शेख सलीम शेख महेबुब हे लोकांकडून पैसे घेवून त्यांना टाईम बाजार मटकाच्या चिठ्ठ्यावर आकडे लिहून घेवून त्यांना चिठ्ठ्या देत असतांना आढळून आले. पोलिसांनी आरोपींकडून नगदी १७ हजार ४० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कार्यवाही अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या पथकातील जमादार पवार, अंमलदार पवार, नरवाडे, अर्जून यादव यांनी केली आहे.

# गावठी पिस्टल बाळगणाऱ्यास केले जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**

गावठी पिस्टल व जीवंत काडतुस बाळगून शहरात सार्वजनिक ठिकाणी लोकांमध्ये दहशतीचे व भितीचे वातावरण निर्माण करणाऱ्या आरोपीस शहर पोलिसांनी जेरबंद केले असून आरोपीविरूध्द शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार करण बालाजी बांगर वय २४ हा गावठी पिस्टल व जीवंत काडतुस बाळगून शहरात दहशतीचे व भितीचे वातावरण निर्माण करीत असल्याची माहीती शहर पोलिसांना मिळताच पोलिसांनी शोध घेत करण बांगर यास औंढा नागनाथ रोडजवळ असलेल्या स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रोडवर ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक गावठी पिस्टल व दोन जीवंत काडतूस मिळून आले असून पोलिसांनी ते जप्त केले आहेत. याप्रकरणी पोउपनि गजानन साखरे यांच्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, उपनि गजानन साखरे, जमादार सुनील अंभोरे, दिलीप लेकुळे, संतोष कऱ्हे, आकाश बोथीकर, भूषण जोगे, बाबासाहेब कांबळे यांनी केली आहे.

आगामी काळातील सण उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी शहरात हत्यार बाळगणाऱ्यावर विशेष मोहीम राबवून कार्यवाही करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस विभागाच्यावतीने देण्यात आला आहे.

# जिल्हा वार्षिक योजनेच्या विकास कामांचे प्रस्ताव १० ऑगस्टपर्यंत सादर करा- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**



जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रस्तावित विविध विकास कामांचे अंदाजपत्रक तात्काळ तयार करून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत. तसेच प्रत्येक कामाचे यूआयडी क्रमांकासह प्रस्ताव १० ऑगस्टपर्यंत सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

लोकप्रतिनिधींनी प्रस्तावित केलेल्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी कार्यवाही गतिमान करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले. यामध्ये शाळा वर्गखोली बांधकाम, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकाम तसेच दुरुस्ती, अंगणवाडी बांधकाम, ग्रामीण रस्ते, इतर जिल्हा रस्त्यांचा विकास व मजबुतीकरण, तीर्थक्षेत्र विकास, दलित वस्ती विकास, जलसंधारण, शाळा क्रीडांगण विकास यासह विविध कामांचा समावेश आहे. या सर्व कामांचे अंदाजपत्रक यूआयडी क्रमांकासह तयार करून प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करावेत. तसेच दायित्वाच्या कामांचे प्रस्तावही तात्काळ सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या वृक्ष लागवड मोहिमेचा आढावा घेतला. जिल्ह्यात आतापर्यंत झालेली वृक्ष लागवड तसेच आगामी काळात करावयाच्या वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टाचा त्यांनी विभागनिहाय आढावा घेतला.

हिंगोली जिल्ह्यासाठी यापूर्वी ७ लाख ९८ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. अमृत वृक्ष योजनेंतर्गत हे उद्दिष्ट वाढवून ११ लाख करण्यात आले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ६ लाख ४८ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. उर्वरित उद्दिष्टानुसार संबंधित विभागांनी नियोजनबद्ध पद्धतीने वृक्ष लागवड पूर्ण करावी तसेच लागवड केलेल्या वृक्षांची माहिती 'अमृत वृक्ष' ॲपवर अद्ययावत करावी. वृक्ष लागवड मोहिमेत हिंगोली जिल्ह्याला आघाडीवर आणण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने प्रभावीपणे काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

# साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ ऑगस्ट**







साहित्य सम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले.

शहरातील अण्णाभाऊ साठे चौक येथील पुतळ्यास आमदार तानाजी मुटकुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, नगरसेवक उमेश गुठ्ठे, नगरसेवक राजेश गोटे, नगरसेवक हमीद प्यारेवाले, नगरसेवक कैलास शहाने, संतोष टेकाळे, रजनीश पुरोहित, के.के. शिंदे, विलास गोरे, बाबा घुगे, यांच्या सह इतरांची उपस्थिती होती. एक ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंगोलीच्यावतीने शहरातील आंबेडकर चौकातील श्री अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला मालयार्पण करून सर्व स्वयंसेवकांनी आदरांजली वाहिली. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शहर संघ चालक डॉक्टर पुरुषोत्तम तोष्णीवाल, समरसता विचार मंचचे वामनराव पवार सह सर्व पदाधिकारी तसेच शहरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्व जिल्हा कार्यकर्ते सीए महेश बियाणी, एडवोकेट दिलीप झंवर, शहर कार्यवाह सुमित महाजन, शहर सहकार्यवहा अभिषेक देशमुख, गजानन सिंग ठाकूर, जिल्हा प्रचारक शहाजी गटकुळ, हिंगोली शहर प्रचारक, सुदाम गवळी आधी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडी संपर्क कार्यालय, शिरड शहापूर येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन व विचार जागर कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल कांबळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे शोषित, वंचित आणि कष्टकरी समाजाचे बुलंद आवाज होते. या कार्यक्रमास सेवानिवृत्त मुख्याध्यापक आनंद ढेंबरे, के. डी. महाजन, बौद्धाचार्य पी. एम. कांबळे, समतादूत बार्टी सुकेश कांबळे, गजानन रावले, राजेश कांबळे, संतोष गवरकर, पठाण हनीऊल्ला, अमीन शेख, विजय आडे, अजय कांबळे, चांदू इंगळे, जयदीप राठोड, विश्वनाथ गायकवाड, दशरथ खंदारे, चंद्रकांत खंदारे, राहुल गायकवाड, रवी खंदारे, साईनाथ कांबळे, सय्यद जावेद, यशवंत कांबळे तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### विष्णुनगर जैन मंदिरात प्रथमच सिद्धचक्र विधान उत्साहात



छत्रपती संभाजी नगर श्री 1008 चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर विष्णुनगर येथे अष्टानी का पर्व निमित्त आयोजित सिद्धचक्र विधानास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमात याप्रसंगी सविता घोडके, वैशाली धोंगडे ,सविता खुळे ,ज्योती खुळे, चंदाबाई गवळी, माधुरी गवळी ,सुनीता गोसावी, कल्पना जैन, लताबाई क्षीरसागर, लिलाबाई धोंगडे ,वंदना गवळी ,प्रणिता वायकोस ,सुरेखा बाई घोडके, कल्पना बाई बुजुर्गे, अनिता वायकोस ,कल्पना खुळे आदी महिला सक्रिय भक्ती भावाने सहभाग नोंदवून पूजन केले. सकाळी भगवंताचा अभिषेक शांति मंत्र व सिद्ध चक्र विधान . संगीतमय विधान पूजन पंडित रामदास चतुर यांच्या संगीत ध्वनीने संपन्न करण्यात येत आहे विधान यशस्वी करण्यासाठी मंदिर अध्यक्ष बाहुबली वायकोस, सचिन शिरसागर, जयकुमार वायकोस ,शुभम घोडके, सुभाष क्षीरसागर, रमेश काळे आधी परिश्रम घेत आहे. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली

### शिर्डीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अनोखा उपक्रम:

## साई आश्रया अनाथालयातील मुलांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप



**शिर्डी (प्रतिनिधी) :** भारतीय लहुजी सेनेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिर्डीतील 'साई आश्रया अनाथालयात' अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष समीर वीर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सालाबादप्रमाणे यंदाही अनाथ मुलांना शैक्षणिक साहित्य, मिष्टान्न भोजन आणि फळांचे वाटप करत अनोख्या पद्धतीने जयंती साजरी केली.

याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते, माजी उपनगराध्यक्ष विजयराव कोते, माजी उपनगराध्यक्ष सुजित गोंदकर,उपनगराध्यक्ष मंगेश त्रिभुवन,नगरसेवक बापू ठाकरे यांसह मान्यवरांनी उपस्थिती लावत प्रतिमेचे पूजन केले व समीर वीर यांच्या वर्षानुवर्षे जयंतीनिमित्त अविरत चालत आलेल्या या अनोख्या उपक्रमाचे कौतुक केले

अनाथ मुलांसोबत वेळ घालवताना आणि त्यांना खाऊ-साहित्य वाटप करताना संस्थापक अध्यक्ष समीर वीर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. "या चिमुकल्या अनाथ मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून जयंती साजरी करताना मनाला असीम आणि मनस्वी समाधान लाभते," अशी भावना त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय लहुजी सेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतली. यात भारतीय लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष समीर वीर,प्रशांत बागुल,शिवाजी उमाप ,सोमनाथ आडंगळे ,रोहित वीर ,विकास आडंगळे ,रितेश खरात ,नाजीम पटेल ,सागर अमोलिक ,साई वीर ,साई कांबळे ,आशिष महाडिक ,हिमांशू पटेल, सिद्धार्थ कुऱ्हाडे यांसह कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना वंचित बहुजन आघाडीकडून अभिवादन



तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.०१ ऑगस्ट - लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडीच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष सुनिल सिरसाठ यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याचा गौरव केला. त्यांच्या विचारांचा वारसा समाजात अधिक प्रभावीपणे पोहोचवून सामाजिक समता, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांसाठी कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष अरविंद कांबळे, जिल्हा संघटक राजेंद्र पगारे, सहयोग जावळे,रवी भालेराव, सी. बी. पवार, तालुका संघटक ईश्वर गायकवाड, तालुका महासचिव धर्मा मोरे, अनिल शिरसाठ,सतीश धनेधर,अमोल साळवे, राजू कमेटी, संतोष पुसे, संदीप घोंगटे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनवादी विचारांचा प्रसार करण्याचा तसेच त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

